
# माणूस

शनिवार

९ जानेवारी ७१

चाळीस पैसे






घरबांधणी, रस्ते बांधणी

श्रमसेनेसारख्या निमलष्करी संघटना

दरवर्षी किमान दोन लाख विहीरी

............

**डॉ. बसंत पटवर्धन**



शनिवार, ९ जानवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : सत्तावे दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : एकावन्नावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


**सप्रेम नमस्कार...**

## 'हिंदूसमाजवादी' कोण?

□ बुधवार दि. १६ डिसेंबर १९७० च्या अंकातील 'हवे ते शेख मुजीबर रहिमानी राजकारण' हा लेख वाचला. त्यावरील काही विचारांचे स्पष्टीकरण जरूर आहे. हिंदुत्ववादी राजकारण कोणाचे आहे याचाही रोख स्पष्टपणे मांडणे जरूर आहे. हिंदू सर्वसामान्य माणूस हा सहिष्णु असतो. परंतु ज्यावेळेला हिंदू माणसावर 'हिंदू' म्हणून अन्याय होतो तेव्हाच त्याला आपण हिंदू म्हणून आपल्यावरील अन्याय सहन करू नये असे वाटले तर तो जातीय ठरतो का? हाच जातीय म्हणून शिक्का मारलेला माणूस इतर धर्मांबद्दल तेवढ्याच कडवटपणे बोलत नाही, म्हणजेच तो जातीय नाही हे स्पष्ट नाही का? माणसाच्या निरोगी शरीरामध्ये ज्या अपायकारी रोगाचे जंतू शिरतात–त्याच्याविरुद्ध प्रतिक्रिया होणे हे जसे नैसर्गिक आहे, त्याचप्रमाणे राष्ट्राला खंडित करून टाकण्यासारख्या तीव्र जातीयतेविरुद्ध खरे पाहता जेवढी तीव्र प्रतिक्रिया व्हायला पाहिजे, तेवढी होत नाही हीच दुर्दैवाची गोष्ट आहे. 'संख्येने अल्प असलेल्या मुसलमानांना समान लेखले जाणार नसेल तर आमचे वेगळे राष्ट्र हवे, या भूमिकेमधून लीगने राजकारण केले', हे विधान इतिहासाला धरून आहे का? म. गांधींनी मुसलमानांना जास्त सवलती देता देता कोरा चेकसुद्धा

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

देऊ केला होता. आणि आजच्या भारतीय जनसंघासारख्या जातीय म्हणून शिक्का मारल्या गेलेल्या पक्षाची विचारसरणी छत्रपती शिवाजीमहाराजांच्या विचारसरणी-पेक्षा निराळी नाही. परंतु शिवाजीमहाराजांनासुद्धा 'वाट चुकलेला देशभक्त' ही पदवी मिळाली होती. त्याच विचारसरणीतील अवशेष जनसंघाला जातीय म्हणतो. 'राष्ट्रनिर्मितीच्या विशिष्ट राजकारणी पार्श्वभूमीमुळे भारतातील मुसलमान व पाकिस्तानमधील हिंदू त्या त्या राष्ट्राशी समरस होऊ शकले नाहीत' हे विधान-सुद्धा सत्याला धरून नाही. मुसलमानांच्या आक्रमणाला हिंदूंची थोडीशी संरक्षणा-त्मक प्रतिक्रिया झाली की दोघांच्याही पदरात अपराधाचे माप टाकण्याची फॅशन खूप जुनी आहे. स्वतंत्र हिंदुस्थानमध्येसुद्धा २४ जातीय दंग्यांच्या चौकशीच्या रिपोर्टमध्ये २३ दंगे अल्पसंख्याकांनी सुरू केले असा निष्कर्ष आहे. म्हणजेच भारतात मुसलमान समरस होऊ शकले नाहीत हे खरे आहे. पण पाकिस्तानात हिंदू समरस होऊ शकत नाहीत हा निष्कर्ष कशावरून काढला ? जे लाखो हिंदू निर्वासित इथे आले त्यांच्या कहाण्या काय आहेत ? रवींद्र पिंगे यांच्या लेखाचा हवाला दिलेला आहे तो ठीक आहे. पण पाकिस्तानी जनता, पाकिस्तानी सरकार अगर पश्चिम पाकिस्तानातील गुंड कोणाकडून का होईना पण पाकिस्तानी हिंदूंचीच ससेहोलपट झाली व होते हे तरी सत्य आहे ना ? मग पाकिस्तानी हिंदू त्या राष्ट्रामध्ये कसे समरस होणार ? आणि जर शेख मुजीबुरसारख्यांनी सारखा न्याय व संरक्षण देण्याचे मान्य केले तर राष्ट्रीय एकात्मता पाकिस्तानमध्ये होऊ शकते हे निर्विवाद आहे, परंतु मूलभूत फरक हा आहे की, पाकिस्तानमधील हिंदूंना समान हक्क व संरक्षण पाहिजे आहे तर भारतातील हिंदूंना समान हक्कासाठी आपल्याच सरकार-बरोबर झगडावे लागत आहे. परंपरेने आलेला भारताचा 'भगवा झेंडा' (त्यागाचे प्रतीक) व स्वातंत्र्यलढ्यातील राष्ट्रगीत 'वंदे मातरम्' यांचा त्याग काँग्रेसने मुस्लिम अनुयायांकरता केला हाच धार्मिक समाजवादाचा (हिंदू बहुसंख्य असल्या-मुळे) सर्वात मोठा पराभव आहे. 'भारतातल्या हिंदूच्या भावनांना ठेच पोचविणारे काय घडले आहे' हा प्रश्न हास्यास्पद आहे. येथील राज्यसत्ता नावालाच सेक्युलर आहे. सनातनी हिंदूंचा प्रश्नच सोडा. परंतु कायदा बहुमताने संमत झाला की सर्वांनाच तो लागू केला पाहिजे की नाही ? बहुपत्नीकत्व सर्वच मुसलमानांना पाहिजे का ? एकपत्नीत्व सर्वच हिंदूंना पाहिजे का ? मग कायदा सर्वांना एकच का करू नये ? देवळाप्रमाणे पीर वा मशीद चटकन् का हलविली जाऊ नयेत ? पहाटे झोपेच्या वेळी मशिदीवरील फकिराची बांग हिंदूंची झोपमोड करते त्याच्या-वर कधीतरी तक्रार सहिष्णु हिंदू करतात का ? मग मशिदीसमोर केव्हातरी मिरवणूक जाते तेव्हा वाद्यबंदी का ? सहिष्णु हिंदूंची मागणी खऱ्याखुऱ्या धर्मातीत न्यायाची आहे. भारतीय जनसंघाला जातीय म्हणणाऱ्यांपैकी कोणीतरी कधीतरी कसलातरी पुरावा दिला आहे का ?

भारतीय जनसंघाचे जास्तीत जास्त आक्रमक अगर जातीय धोरण म्हणजे 'हिंदू आता मार खाणार नाहीत' हे अटलजींचे भाषण. त्यात चूक आहे का? तथा-कथित निधर्मी लोकांचे म्हणणे असे आहे का की, हिंदूंनी असाच यापुढेही मार खावा? हिंदूसमाजामध्ये काही चुका असतील; पुराणमतवाद असेल, मूर्तिपूजा असेल, अंधश्रद्धा असेल, अस्पृश्यता असेल, हे दोष काढण्याचे प्रयत्न जोमाने होत आहेत. पंढरपूरला विश्वहिंदूपरिषदेमध्ये अस्पृश्यता नाहीशी करण्याचा ठराव पास झाला. त्यात सनातनी हिंदू होते की नाही? परंतु काही बाबतीत चुकत असलेला हिंदूसमाज हा कधीही असहिष्णु नव्हता, किंबहुना वाजवीपेक्षा जास्त सहिष्णु आहे व होता हीच एक चूक आहे.

शेख मुजीबरी राजकारण व सावरकरी राजकारण यात श्री. वसंत पळशीकर यांना काय फरक दिसतो? "आलेत तर सह न आल्यास तुमच्याशिवाय व विरोध कराल तरीसुद्धा आम्ही स्वराज्य मिळवू" या सावरकरांच्या वाक्यात काय चूक आहे? सुदैव शेख मुजीबरचे की त्याला सहकार्य करणाऱ्या हिंदूंशी त्याची गाठ पडली व दुर्दैव सावरकरांचे की त्यांना विरोध करणाऱ्या जातीय मुस्लिमांशी व शाब्दिक, मानसिक हिंसासुद्धा न करणाऱ्या पराभूत मनोवृत्तीच्या हिंदूंशी गाठ पडली. कालचक्र पालटत आहे. आत्यंतिक अहिंसा जाऊन आता हिंसेचे युग सुरू झाले आहे. पुढाऱ्यांचे खून पचविण्याचे दिवस गेले. आता पुढाऱ्याला अटकेत टाकल्या-बरोबर रस्त्यावर लढा देणारी पिढी निर्माण झाली आहे. कारण त्यांना इतिहास माहीत आहे की प्रचलित सरकार 'प्रत्यक्ष कृती' जाणते व ती वेळेवर केली नाही तर पुढारी तुरुंगात मरण्याचासुद्धा धोका आहे. परंतु ही दोन्ही टोके सोडून आपण सर्वांना न्याय देऊ शकणारा पक्ष दिल्लीला सत्ताधीश करू शकणार नाही का? जो पक्ष खराखुरा धर्मातीत आहे तोच आपल्याला आर्थिक समानतेकडे नेईल. कारण जो न्यायी आहे तो सर्वच बाबतीत न्याय देईल.

२२ डिसेंबर, १९७१ — सौ. संजीवनी रायकर, मुंबई.

# हे सारे खेदजनक आहे

◻ 'भारतीयकरण ही केवळ घोषणा नाही, हे जीवनदर्शन आहे. ही प्रतिक्रिया नाही, ही ऐतिहासिक प्रक्रिया आहे. गेली शेकडो शतके भारतीय लोक इतरांना पचवीत आले आहेत. त्याचेच नाव भारतीयकरण.' हे अटलबिहारींचे भारतीय-करणावरील भाष्य ऐकून त्यास कोण विरोध करणार?

'जनसंघाचे राजकारण नकारात्मक आहे' हे विधान चूक आहे. ज्या ज्या वेळी जनसंघाने विरोध केला त्या त्या वेळी पर्यायी योजना समोर ठेवल्या आहेत. आता हेच पहा ना. आतापर्यंतच्या पंचवार्षिक योजना अयशस्वी ठरल्या म्हणून जन-संघाने चौथ्या पंचवार्षिक योजनेला पर्यायी 'स्वदेशी योजना' तयार केली.

कोणत्याही प्रकारच्या परकीय मदतीवर अवलंबून न राहता, आर्थिक प्रगतीच वेग १०% करून पूर्ण रोजगारीची हमी देणारी अशी ही योजना. पण केवळ जनसंघाने ती तयार केली म्हणून नाकारली.

आजची देशाची प्रगती म्हणजे ८०% हिंदूंची प्रगती असा अर्थ आहे. एवढेच नव्हे तर देशासाठी मरावयाचे झाले तर हिंदूंनीच, देशासाठी भीक मागावयाची झाली तर हिंदूंनीच व त्याची लाज बाळगावयाची झाली तर तीही हिंदूंनीच. पण आपण अशी विधाने केली तर 'जातीयवादी' म्हणून बिरूदावली चिकटेल त्याचे काय? जनसंघाने म्हणे नंग्याभूक्यांचा विचार केला नाही. अस्पृश्यता निवारणाचा कार्यक्रम नाही. विचार आहे. कार्यक्रम आहे. दिल्लीचे उदाहरण देतो. जनसंघ गेली तीन वर्षे दिल्लीत सत्तेवर आहे. आश्वासने दिल्यापेक्षाही जनसंघाने हरिजनांसाठी पुष्कळ काही केले आहे. हरिजनांसाठी नोकरीच्या उपलब्धतेचे प्रमाण ३% वरून १३% पर्यंत पोहोचले आहे. खुद्द जगजीवनरामांनीसुद्धा हरिजन कल्याण केंद्राने केलेल्या कामाची प्रशंसा केली आहे. चार हजार हरिजनांना जमिनीचे मालकी-हक्क बहाल केले आहेत. राष्ट्रात ही एक वैचारिक क्रांती आहे, ती समाजवाद्यांनी केली नसून जनसंघाने केली आहे. शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची कमाल मर्यादा १४५ वरून २०० रु. दरमहा केली आहे. ५० हरिजन मुलींसाठी वसतिगृह बांधले आहे. दिल्लीमध्ये हरिजन मोगलांपासून चालत आलेल्या तबेल्यात राहत असत, त्यांच्यासाठी दीड कोटी रक्कम वेगळी काढली आहे. हरिजन विधवांसाठी विधवाश्रम व त्यक्ताश्रम चालू असून नव्याने चालू केलेल्या अनाथाश्रमातून ११०० मुला-मुलींना आश्रय देण्यात आला आहे. जनसंघाने अकरा एकराचा एक मोठा प्लॉट विकत घेऊन तेथे १२०० भिकाऱ्यांना रोजगार देण्याची कल्पना हातात घेतली आहे. आणि हे सर्व करीत असता पूर्वीच्या शासनाने केलेले कर्ज फेडावे लागत आहे. बाईंच्या तथाकथित कागदी समाजवादी राज्यापेक्षा हे कल्याणकारी व प्रत्यक्ष कामावर भर देणारे राज्य जास्त हितावह नाही काय?

औद्योगिक क्रांती व अनिर्बंध वैयक्तिक स्वातंत्र्याचे तत्त्व यामुळे बळावलेल्या भांडवलशाहीच्या जाचक परिणामांच्या संदर्भात 'समाजवादाचा' उगम आहे. तर जुलमी राजेशाही व सरंजामशाही यांच्या प्रतिक्रियेतून लोकशाही जन्माला आली आहे. परदेशातून आलेली प्रत्येक गोष्ट त्याज्यच असते असे नाही परंतु परकीय कल्पनांचा स्वीकार करताना स्वीकारणाऱ्याशी तिचे सात्म्य (Hssmilation) राहील की नाही याचा विचार करावा लागतो तर प्रयोगावस्थेत असलेल्या वादांचा विचार करणे दूर राहिले.

राजकीय कारणास्तव आज अनेकजण समाजवादाच्या गोष्टी करताहेत. खाजगी धंद्यांविरुद्ध ओरड करून जास्तीत जास्त सरकारीकरण झाले की, समाजवाद येईल ही समजत. परतु सर्वंकष सरकारीकरण स्वीकारलेल्या देशातील लोकांच्या राहणी-मानाचा दर्जा गेल्या पंचवीस वर्षात जेवढा वाढला, त्यापेक्षा कितीतरी अधिकपटीने

तो न स्वीकारणाऱ्या देशांचा वाढला आहे. प्रत्यक्ष रशियात शेती व औद्योगिक प्रगतीची खुंटलेली वाढ पाहून योजनाकार अडचणीत सापडले आहेत. भारताच्या सर्व आर्थिक अपयशावर जे राष्ट्रीयकरणाचा उपाय सुचवितात त्यांनी रशियाकडे नजर टाकावी. सवलती देऊनही शेती उत्पादन कमी, औद्योगिक क्षेत्रात प्रचंड प्रमाणावर नासाडी, नोकरांची दांडगाई, तोटयात चाललेले कारखाने, मागासलेली उत्पादनपद्धती, अशी वस्तुस्थिती असताना इथले कम्युनिस्ट रशियन धर्तीवरील नियोजनाचा आग्रह धरतात तो केवळ त्यांच्या वैचारिक गुलामगिरीमुळे. हे एक वेळ क्षम्य मानले तरी तथाकथित समाजवादी तरुण (?) मंडळी जेव्हा हा आग्रह धरतात तेव्हा त्यांच्या बौद्धिक दारिद्र्याचे व विकृतीचे आश्चर्य वाटते.

प्रसिद्ध उद्योगपती श्री. जे. आर. डी. टाटा यांनी आकडेवारी देऊन हे स्पष्ट केले आहे, की सर्वंकष नियंत्रण व सरकारीकरण हा आर्थिक प्रगतीचा मार्ग नव्हे. हा मार्ग न स्वीकारलेल्या देशाचे तुलनात्मक दरडोई उत्पन्न आपल्यापेक्षा अधिक आहे. सिंगापूरचे १० पट, जपानचे १६ पट, ऑस्ट्रेलियाचे ३३ पट अधिक आहे. आपल्याकडे मात्र औद्योगिक प्रगतीत अडथळा आणण्याचे काम चालू आहे. बरं, एवढं करूनही सरकार औद्योगिक उत्पादन ताब्यात घेऊन कार्यक्षम करीत असते तर वेगळे. पण सरकारला स्वतःचे कारखाने धड चालविता येत नाहीत. नवे मोठे कारखाने काढले तर मिरासदारी वाढते ह्या खुळचट व आत्मघातकी कल्पना. त्यामुळे कारखानदारीही वाढत नाही, उत्पादनही वाढत नाही. आपल्याकडेही भांडवलदारीवर व खाजगी मालमत्तेवर वाजवी नियंत्रणे घातली पाहिजेत. राष्ट्राच्या आर्थिक अवस्थेत सरकारी व खाजगी अशा परस्पर व्यावर्तक (Mutually exclusive) क्षेत्राची कल्पना केली पाहिजे. 'सिद्धान्त व नीती' ही पुस्तिका वाचल्यास खाजगी मालमत्तेचा समाजनिरपेक्ष अधिकार जनसंघ मानीत नाही हे वाचून समाजवाद्यांचे डोळे उघडतील.

श्री. बर्ट्रम वुल्फ यांनी म्हटले आहे की, "मार्क्सवाद" हा एखाद्या शास्त्राप्रमाणे व धर्माप्रमाणे निश्चित व बंदिस्त वाटतो. १९ व्या शतकात शास्त्र हा परवलीचा शब्द असल्याने मार्क्सवादाचे आकर्षण वाढीस लागले हे खरे. पण मार्क्सवादात शास्त्रीय काय आहे ते मात्र समजत नाही. मार्क्सवादाची अव्यवहार्यता खुद्द मार्क्सला उमगली होती म्हणून बहुधा एक ठिकाणी त्याने 'I myself, am not Marxist' असे म्हटले असावे.

आज सर्वत्र साम्यवादी जगात राष्ट्रवादाची उफाळी फुटली आहे. झेकोस्लोव्हाकियात जे झाले, युगोस्लाव्हियात जे होऊन गेले आणि रुमानियात, हंगेरीत जे होऊ घातले आहे ते दुसरे तिसरे काही नसून आपली साम्राज्यवादी भूक शमविण्यासाठी रशियाने संगीनीच्या जोरावर आजवर दाबून ठेवलेल्या राष्ट्रवादाचा उद्रेक आहे.

जनतेच्या प्राणापेक्षा राष्ट्रवाद मोठा मानावयाचा का? हा प्रश्नच मुळात राष्ट्र-

वादी तरुणाला पडू शकत नाही. राष्ट्रवाद ही एक मूलभूत प्रेरणा आहे की जिच्यासाठी लाखोंनी बलिदान करावे, हे मार्क्सला त्याच्या हयातीत पहावे लागले आणि युद्धाच्या अपरिहार्यतेचा सिद्धांत मांडावा लागला. मी तर यापुढे जाऊन म्हणेन की, चार पंचवार्षिक योजना थांबल्या तरी चालतील. एक वेळ उपाशी राहू ' लेकिन अणुबम्ब बनाना चाहिये ।'

राष्ट्रवादाच्या नावाखाली जनता उपाशी नाही. नकली समाजवादाच्या गप्पा करून, सत्तास्पर्धा, पक्षबाजी, राजकीय सौदेबाजी, भ्रष्टाचार व अराजक देशात माजविणारे तथाकथित समाजवादीच देशाला उपाशी ठेवू पाहात आहेत. ism च्या आहारी न जाता देशहितकारक नियोजनाची जरूरी आहे. त्यासाठी निश्चित कार्यक्रम, योजना आखाव्या लागतात व त्या कार्यवाहित आणण्यासाठी चांगली माणसे लागतात व ती निर्माण करण्याकरिता काही व्यवस्था असावी लागते.

जनसंघाचा संस्थानिकांचे तनखे बंद करावे याविषयी ' विरोध नव्हता. होता तो फक्त बंद करण्याच्या पद्धतीबद्दल. संस्थानिकांच्या जनसंघप्रवेशाबद्दल जनसंघीयांनी सुनावले की, तुमच्या हक्काच्या जपणुकीकरिता जनसंघ आपल्या तत्त्वांची पायमल्ली कधीच करणार नाही. सामान्य सदस्य म्हणून प्रवेश करा. मागे एकदा एक ' जनरल ' (नाव आठवत नाही) जनसंघ प्रवेश करू इच्छित होते. तर त्यावेळेस पंडित दीनदयाळजींनी सांगितले की, ' एवढा मोठा मनुष्य आम्ही कसा पचविणार ? जनसंघ अजून Deep Rooted झाला नाही. ' नाहीतर कालच्या ' राजमाता आजच्या मुख्यमंत्री ' काय तर्कदुष्ट प्रमेयाच्या आधारावर विधान केले आहे. ' भूमिबळकाव ' आंदोलनाचा केवढा गाजावाजा झाला. पण दिल्लीच्या जनसंघशासनाने ७६००० एकर जमीन वाटावयास काढली तिची कोणी दखल घेतली नाही. आज ' जमीनबळकाव ' उद्या ' घरबळकाव ' सुद्धा येईल. नेम काय हो ! दिखाऊ समतावादानं राष्ट्रवादी पक्षात न्यूनगंड निर्माण करणें, वर्गद्वेष निर्माण करणे हेच तर कम्युनिस्टांचं तंत्र होय,

देशाच्या सीमेवरचे शत्रू पुऱ्या तयारीनिशी उभे असताना, नकली समाजवादापेक्षा भ्रष्ट व लाचखाऊ सरकार बदलून लोकजीवन शुद्ध करण्याची आवश्यकता असताना, देशातून देशद्रोह्यांचे उच्चाटन करणे आवश्क असताना, जेव्हा बहुसंख्य जमातीतील लोकांना बाटविण्याचा उघड मनोदय देशातील उर्दू वृत्तपत्तातून व्यक्त केला जात आहे, अशावेळी परदेशातून येणाऱ्या आदेशावर जगणाऱ्या एखाद्या पक्षाचा, धनिक विनाशाचा कार्यक्रम आम्हाला राजकीय कोंडचात टाकावा हे सारे निःसंशय खेदजनक आहे.

वढचा छोटचा लेखात सर्व गोष्टींचा उहापोह करता आला नाही. मी कुठल्याही राजकीय संस्थेचा सदस्य नाही. आभार.

२५ डिसेंबर, १९७० — वि. स. पाटणे, चिपळूण

## डॉ. वसंत पटवर्धन

बँक ऑफ महाराष्ट्र

# एका अर्थतज्ज्ञाच्या दृष्टिकोनातून माझा जाहीरनामा

निवडणुका जाहीर झाल्या आहेत आणि विविध पक्षांचे जाहीरनामे दोन चार दिवसात बाहेरही पडतील. ज्यांना राज्य करण्याची जबाबदारी अंगावर घ्यायची असते त्यांना आपल्या जाहीरनाम्यात मतांचा पाऊस पडण्यासाठी भारतासारख्या देशांत ज्या काही आश्वासनांचा फुलोरा फुलवायचा असतो त्याकडे डोळेझाक करता येत नसली तरी पुढे प्रत्यक्ष कृतीही करायची असल्याने झेपेल तेवढाच कार्यक्रम द्यायचे बंधनही पडते. सत्तेची दहीहंडी ज्यांच्यासाठी खूपच उंच असते त्यांना वारेमाप आश्वासने देण्यात तरी कुचराई करण्याचे काहीच कारण नसते. नाण्याच्या अशा दोन बाजू असल्या तरी या वेळेला 'सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात्सत्यमप्रियम्' अशाच भावनेने पक्षनेते वागत असतात. 'अप्रियस्यापि सत्यस्य' वक्ता यावेळी तरी दिसत नाही. अलिप्त आणि उदासीन म्हणून ज्या वर्गाचे वर्णन केलं जातं त्या वर्गात अशी काही माणसं असतात पण आपण बोलून काय होणार अशा न्यूनगंडामुळं ती बोलत नाहीत, तर काही आपल्या स्थानामुळं किंवा तत्सम बंधनामुळं मत प्रदर्शन करणं इष्ट होणार नाही अशा समजुतीनं अलिप्त रहातात आणि निवडणुकीनंतर काय केलं पाहिजे यावर सांगण्याचा आपला नैतिक हक्क घालवतात. त्यामुळं हा लोकांच्या जाहीरनाम्याचा उपक्रम स्वागतार्ह म्हटला पाहिजे. कारण त्याद्वारे निवडणुकांचे मूळ साध्य जे लोकशिक्षण, ते गाठण्यासाठी

थोडीफार मदत होईल. पूर्वीच्या निवडणुकात हा भाग फारसा नव्हता. पण आता पक्षोपक्षांच्या सामर्थ्यामुळं या लोकशिक्षणाची मोठी गरज आहे.

एकाद्या पक्षाला जसा सर्वांगीण जाहीरनामा काढता येतो तशी शक्यता कुठल्याही व्यक्तीला आपला म्हणून जाहीरनामा काढताना असणार नाही. किंबहुना कुठलीही व्यक्ती अगदी थोडक्या शब्दात जेव्हा आपली ध्येय–धोरणं काय असावीत हे सांगायाचा प्रयत्न करील तेव्हा ती आपापल्यापरीनं त्यातील निवडक अशा पण वेगवेगळ्या मार्गावर नि साधनांवर व मागण्यांवर भर देईल. पण सध्याच्या अनिश्चित अशा परिस्थितीतील निवडणुकांचं आवाहन आणि आव्हान पुढं आलं असता देशासाठी कुठं मुरड घालून काय साध्य करायचं याबाबत मात्र फारशी मतभिन्नता आढळून चालणार नाही.

या १९७१ च्या निवडणुकांवर आपली समाजवादी व धर्मनिरपेक्ष पद्धती कशी रहावी हे ठरणार आहे. जास्तीत जास्त हित साधणारा समाजवाद अंगिकारल्याखेरीज आपल्याला तरणोपाय नाही. आजच्या या काळात जगभर सर्वत्रच राज्यकर्त्यांच्या समोर खूप प्रश्नचिन्हं सतत उभी रहात असतात कारण काही विचारवंताना वाटतं तसे केवळ आर्थिक, केवळ राजकीय किंवा केवळ सामाजिक असे निर्णय आजकाल घेताच येत नाहीत. म्हणूनच बँक राष्ट्रीयीकरणासारख्या निर्णयामागे राजकीय बळजोरी होती हे मानूनही त्याला काही सामाजिक व आर्थिक निकड ही बाजू होती व म्हणूनच त्याचा पाठपुरावा केला पाहिजे असं निदान मला तरी वाटलं होतं. कुठल्याही निर्णयामागं या तीन दोन्यांची ब्रह्मगाठ असणारच आहे आणि हे जर दृष्टीआड केलं तर प्रगती साधणार नाही. आपण मिश्र अर्थव्यवस्था आणि लोकशाही समाजवाद मानलेला आहे तरीसुद्धा त्याबाबतच्या व्याख्या व भूमिका कायमच्या अलवचिक व ताठर असून चालणार नाही, भागणार नाही. अर्थात विशेषेकरून ‘ लोकशाही समाजवाद ’ आणीत असता लवचिकतेच्या आहारी आऊन आपण या तत्त्वाचे ‘ समाजवादी लोकशाहीत ’ रुपांतर अनवधानाने करीत नाहीना हे बघणे अत्यावश्यक असले तरी जास्तीत जास्त समाजाचं जास्तीत जास्त हित साधताना भारतासारख्या दैन्य, दारिद्रय, अशिक्षितपणा व प्रचंड लोकसंख्या यांच्या प्रश्नानं पिडलेल्या देशाला ज्यावेळेला हे हित फार थोड्या वेळात साधायचा निर्धार करायचा आहे त्यावेळेला लोकशाही समाजवादात कदाचित न बसणाऱ्या थोड्या जास्त डाव्या मार्गाचा अवलंब करावा लागेल. नाहीतर श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब झाले नाहीत तरी गरीबच राहून त्यातील दरी वाढायाची जी भीती आपल्याला ग्रासते आहे पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणणे इतर राष्ट्रे व आपण यांच्यातील ज्ञानविज्ञानाची व आर्थिक क्षमतेची पातळी व आपली पातळी यातील अंतर दिवसेंदिवस जास्तच वाढेल व आज जर आपण शभंर वर्षे मागे असलो तर पाच वर्षात हे अंतर दोनशे वर्षांचं

होईल याची जाणीव विसरून चालणार नाही आणि समाजातील काही जणांनी तरी हा विचार या निवडणुकातून मांडून पक्षांच्या जाहीरनाम्यात यावर काही-तरी लिहिलं जाईल व ते लिहिलं गेलं नाही तरी नंतर सत्तारूढ झाल्यावर त्या-बाबत विचार केला जाईल असं बघितलं पाहिजे. या प्रश्नांना एक राजकीय रंग दिल्याखेरीज जाणीवपूर्वक जाग या समाजपुरुषाला येणार नाही व अन्यथा तो पूर्वीच्या निवडणुकांप्रमाणेच काही ठराविक घाण्याभोवतीच गोपुत्रासारखा हिंडत राहील.

नमनाला एवढ्या तेलाची उधळण केल्यानंतर, पुढं कशाचा विचार व्हायला हवा याचा विचार करीत असता अनेक बाबी डोळ्यांसमोर येतात. दिवसेंदिवस खेडी व शहरे, 'आहे रे' व 'नाही रे' वर्ग, प्रौढ आणि तरुण, विज्ञान आणि अशि-क्षितपणा यांच्यातील तणाव आपल्याकडे वाढत आहे. अनेक प्रगत विचाराना केवळ व्यक्तिगत आकसामुळे अडथळे आणले जात आहेत, बेकारी भयाण स्वरूप धारण करीत आहे व अव्यवस्था हा सर्वत्रच स्थायीभाव होऊ बघत आहे. व या सर्वांचे कारण रोगाचे मूळ शोधण्याऐवजी आपल्या गेल्या काही पिढ्यांनी प्रत्येक वेळेला तात्पुरते व वरवर मलमपट्टी करण्याचे उपाय (Adhoc Solutions) आणि तंत्र अवलंबिले हेच आहे. बेकारी ही दरवर्षी वाढत जाणार आहे ही काही आज अचा-नक निर्माण झालेली समस्या नव्हे. पण त्यावर या आधी फारसा विचारच झाला नाही. एकदा औद्योगिकरणाचा घोशा, तर काही वर्षांनी शेती हेच सर्वस्व असल्याचा सक्षात्कार. अशा तऱ्हेने लंबकाप्रमाणे किंवा बिनबाहीच्या ते हातभर बाहीच्या चोळीच्या फॅशनसारखी आपली योजना सारखी हेलकावे खात आहे. त्यामुळे गेल्या तीन योजना पार पडून आणि आता चौथी योजना सुरू होऊनही 'योजक' अजू-नही दुर्लभच राहिला आहे. आपल्या अर्थव्यवस्थेला योग्य गती देणारा योजक मिळेल ही आशा मागीलवर्षीच्या इंदिरा गांधींच्या अंदाज पत्रकामुळे निर्माण झाली होती. ती आशा साकार करणे अजूनही त्यांच्या व यशवंतरावजींच्या हातात आहे. व त्यादृष्टीने निवडणुकीनंतरचा व पुढील एकदोन वर्षांचे अर्थसंकल्प वाट बघण्या-सारखे आहेत. पण तो भविष्यकाळ आहे.

नुकताच ठक्कर समितीचा एक अहवाल बाहेर पडला. त्यानुसार बँकांच्या प्रत्येक शाखेत दरवर्षी पन्नास नवीन कर्जे देऊन जर स्वयं अर्जन करणाऱ्यांना वाव दिला तर पाच वर्षांत पन्नास लक्ष लोकांना रोजगार लाभेल असं गणित मांडलं गेलं आहे. वरवर बघता ते सोपे वाटले तरी असे नवीन रोजगार हुडकणारे व अर्जन करणारे लाख लोक आपल्या पायावर विश्वासपूर्ण तयार होणे हे अवघड आहे. त्यासाठी निश्चित उपाययोजना खरी लागणार आहे व तिथेच सर्वांची कसोटी आहे. अर्थात तेवढ्यावरच प्रश्न संपत नाही. ज्ञान आणि विज्ञान राबवून आपलं पोट तर भरता येतंच पण उत्पादन वाढवून देशाच्याही संपत्तीत भर घालता येते हा आत्मविश्वास

आजच्या तरुणांच्यात आहेच कुठं ! गुणवत्तेला किंमत नाही असं म्हणत बशिल्यानं नोकरी व केवळ नोकरीच मिळवण्याच्या व ते जमले नाही तर नक्षलवाद बोलण्याच्या भ्रमातच तो हिंडत आहे. सुशिक्षितांची ही अवस्था असल्यावर अशिक्षितांनी काय करावं ?

त्याबाबतीत मोठ्या प्रमाणावर इतर देशांनी कसे रोजगार निर्माण केले याचा आपल्याकडे विचार करायला कुणीच तयार नाही. प्रत्येकाला किमान अन्न, वस्त्र व निवारा मिळाला पाहिजे हे म्हटल्यावर ह्या तीन गोष्टीच निर्माण करण्यासाठी लक्षावधी रोजगार निर्माण होऊ शकतील याचा गंभीर विचार झाला पाहिजे. पंचावन कोटी लोकांना अगदी अत्यल्प निवाऱ्याची सोय करण्यासाठीसुद्धा प्रचंड प्रमाणावर घरबांधणीचा उपक्रम राष्ट्रीय पातळीवर घेतला तर त्यात विदेश विनिमयाची अडचण येणार नाही की कसबी कारागिरांची अडचण पडणार नाही. त्यामुळे घराचा प्रश्न सुटेल व रोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर तात्पुरता तरी पंचवीस वर्षे सुटेल. घरबांधणीत १०० कोटीची गुंतवणूक केली तर अप्रत्यक्ष रोजगारही तेवढ्याच रकमेचा निर्माण होतो हे जपानमध्ये त्या व्यवसायाचा अभ्यास करून जाहीर केले आहे. या घरबांधणीच्या प्रश्नाला अमेरिका, पश्चिम युरोप, पूर्व युरोप इथं जेव्हा जेव्हा चालना मिळाली आहे, तेव्हा तेव्हा तिथल्या आर्थिक परिस्थितीने उत्तुंग झेप घेतलेली आहे. या कामासाठी पैसे कुठले असा प्रश्न निर्माण होईल, पण विमा महामंडळ, व भविष्यनिधितून व तत्सम उभा राहणारा दीर्घमुदती पैसा त्यात गुंतवायचे ठरले तर दरवर्षी अडीचशे कोटी रुपयाची रक्कम ही किमान उभी राहू शकेल. त्यामुळे इतरत्र भांडवलाची चणचण पडेल असं मानण्याचं कारण नाही.

घरबांधणीप्रमाणेच, चांगले व मोठ्या प्रमाणावरील रस्तेबांधणी हाही कार्यक्रम आपल्याच भांडवलावर व रोजगारी वाढवणारा म्हणून घेता येईल. त्याबाबत श्रमसेनेसारख्या निमलष्करी स्वरूपाच्या सेना उभारल्या व त्यात धडधाकट बेकार व्यक्तींना मजुरी देऊन गुंतवले तर दुसऱ्या बाजूने या प्रश्नाची उकल व्हायला मदत होऊ शकेल. चांगले रस्ते झाले की दळणवळण वाढते व पर्यायाने विक्रीचा बाजारही वाढतो. अर्थशास्त्रातील मूलभूत सिद्धांताचा आधार घेऊन आज सगळेचजण गरजा वाढवल्या की मागणी निर्माण होते हे मान्य करून आपला विक्रयव्यवसाय वाढवीत आहेत. त्याला या दोन्ही प्रकारच्या चौकटी बांधणोने (Infra Structure) चालना मिळेल, व आपोआपच उद्योगांच्या विकेंद्रीकरणाला जोर येईल. आजमितीस विकेंद्रीकरणाची किंमत औद्योगिक कंपन्यांकडून भरमसाट मागितली जात आहे व अगतिकपणे ती दिलीही जात आहे. अप्रत्यक्ष अशा या मदतीत सरकारचे न दिसणारे नुकसान होऊन औद्योगिक क्षेत्राची कुरकुर चालू आहेच. सरकार व उद्योगक्षेत्र यांच्यातील भित नाहीशी होऊन एक नवीन वाता-

वरण निर्माण व्हावे अशी श्री. टाटांनी नुकतीच रास्त अपेक्षा व्यक्त केली आहे. जगात अन्य ठिकाणी तुलना करता आपल्याकडे औद्योगिक क्षेत्राचे लाडावलेले बाळ म्हणूनच संभावना करावयास हवी. सतत विक्रेत्यांच्या बाजारात उभे राहूनहो त्यांचो सरकार व जनता म्हणजेच पर्यायाने ग्राहक या दोघांवर टीका चालू असतेच. त्यासाठी अप्रत्यक्ष सवलतीऐवजी, रस्त्यांचे जाळे विणून, त्याचबरोबर व दळणवळणाच्या साधनांचे उत्पादन वाढवून बाजार निर्माण करणारी चौकट बांधणी केली तर आपला विकास लौकर होईल. Infra Structure ची अशी चौकट मात्र योग्य ठिकाणी व्हायला हवी. कित्येकदा अशी चौकट नसल्याने चित्र निघत नाही तर कित्येकांना चित्र असल्याखेरीज चौकट काय कामाची असे वाटते. आधी कोंबडी की आधी अंडं अशासारखो ही समस्या विकासशील राष्ट्रांना आतापर्यंत नेहमीच वाटत आली होती. पण आता मात्र ही मूलभूत चौकट आधी हवी हे मान्य झाले आहे. पुण्याचंच उदाहरण घ्यायचं झालं तर एका काळी पर्वती, कोथरुड, गणेशखिंड नि सातारारोड या चारी बाजूंना वस्ती नव्हती. म्हणून पाणी, वहातूक, रस्ते, दिवाबत्ती या सोयी कशाला असं म्हटलं जायचं. पण पानशेतच्या पुरानंतर अशा सोयी झाल्या व पुण्याचा तोंडावळाच बदलला. चांगल्या सोयी झाल्या की लोकवस्ती आपोआपच तिकडे जाते, हा अनुभव पुण्यातच आलेला आहे. विकास व्यवस्थापनातील ही घडण मात्र आग रामेश्वरी, बंब सोमेश्वरी पद्धतीवर व्हायला नको. या उपरनिर्दिष्ट मूलभूत चौकट बांधण्याच्या तत्त्वाला न मानणारी माणसं कित्येकदा अजूनही न भरलेल्या किंवा कार्यान्वित न झालेल्या औद्योगिक वसाहतीची उदाहरणं दाखवतात, पण त्यांचं अपयश हे ग्राहक निर्मितीचा चौकटीतला एक भाग नसल्यानं आहे. ही निर्मिती झाली की त्यांचंही यश सिद्ध होईल.

घरबांधणी आणि रस्तेबांधणीसारख्या अगदी मूलगामी बाबींप्रमाणे शेतीतही पाणीपुरवठ्याची सोय करून लहान शेतीचे तुकडेही नफ्यात जातील अशी व्यवस्था करायला हवी. आपल्याकडे पडणाऱ्या पावसापैकी आपण दोन टक्के पाणीसुद्धा वापरू शकत नाही. या पाणीपुरवठ्यासाठी मोठाल्या कालव्यापेक्षा प्रत्येक तुकड्यात विहीर असण्याची काय शक्यता आहे याची पहाणी करायला हवी. मराठवाड्यासारख्या ज्या भागातील जमीन अत्यंत मऊ व सुपीक आहे व जियं पन्नास–साठ फूट गेल्याखेरीज विहीर होऊच शकत नाही, तिथे कालव्यांच्या योजना जास्त किफायतशीर व काटकसरी ठरतील. राष्ट्रीयीकृत बँकांतर्फे सरकारने मोठ्या प्रमाणावर पहिली पाच वर्षे हाच प्रधान कार्यक्रम घेतला तर त्यामुळे मोठ्या शेतीतच फायदा होतो ही कल्पना न रुजता लहान शेतीही किफायती असेल ही कल्पना रुजेल. अशा कार्यक्रमात प्राथमिक खर्च करून ज्यांना विहीरी मिळणार त्याची भरपाई करण्याचं राज्य सरकारांनी ठरवलं तर दरवर्षी केवळ १०० कोटी रुपये कर्जात सर्व देशात दोन लाख विहीरींची किमान भर पडायला हरकत नाही. त्यातच

प्रतिवर्षी थोडया थोडया प्रमाणात संकरीत बियाण्याचा पुरवठा, अनेकविध पिके घेणे वगैरे योजनाबद्ध कार्यक्रम आखून शेतीत मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढ घेता येईल व त्यामुळे औद्योगिक वाढीचा वेगही वाढेल.

शेतीतली उत्पन्ने वाढवीत असता ठिकठिकाणची जमीन, हवा वगैरे बघून जर पिकांचे विशेषीकरण झाले तर ते फायदेशीर ठरेल. पण त्याचबरोबर त्यात कुठल्याही तऱ्हेची विभागबंदी होणार नाही, सर्व पीक सगळीकडे जाऊ शकेल ही सुधारणा करायला लागेल. त्याचप्रमाणे विशेषीकरणाच्या नावाखाली अन्नधान्यांना डावलून केवळ नगदी पिकांवरच भर दिला जात नाही ना हेही बघावे लागेल. दरवर्षी पिकांच्या किमान किमती जाहीर करून त्या किंमतींना ते आपल्यातर्फे अगर इतरांकडून बाजारात खरेदी होत आहे असे सरकारला बघावं लागेल व ठिकठिकाणी तालुकानिहायसुद्धा गुदामांच्या सोयी निर्माण कराव्या लागतील. उत्कृष्ट रस्ते व दळणवळण सुरू झाले की सुमारे ३३० जिल्ह्यातल्या प्रत्येकी १० ते १५ अशा तालुक्याच्या किंवा तत्सम ठिकाणी सर्व सोयी उपलब्ध करून बरेचसे केंद्रीकरण या तीन ते पाच हजार गावाभोवतीच केले गेले तर चौकट बांधणीचा बराच खर्च कमी होईल. आपला देश पाच लाख खेडयांचा आहे हे सतत न घोकता त्यातील बहुसंख्य खेडी खानेसुमारीपुरतीच आहेत हे मान्य करून व देशाची बहुतांश रचना या तीन ते पाच हजार गावांची शहरे करून गुंफता येईल व युगोस्लाव्हियानं याबाबतीत गाजावाजा न करता केलेला प्रयोग आपल्याकडेही यशस्वी करता येईल. बँकांची जिल्हावार विभागणी करून एका क्षेत्रात सुरू झालेला प्रयोग संपूर्ण पुरा करायला हवा. सत्तेवर येणाऱ्या पक्षानं मात्र यासाठी दहा वर्षाची एक तपशीलवार योजना आखावी. मग तिच्या रकमेची बेरीज काय होते व ती कशी उभी राहील या दोन प्रश्नानं बिचकून जाऊ नये. अशा शहरी गावांचे एक जाळेच निर्माण झाले की ग्राहकवर्गाचेच विकेंद्रीकरण साधून औद्योगिक विकेंद्रीकरणाचा वेग प्रकर्षाने वाढेल.

उद्योगधंद्यांच्याबाबत आजपर्यंत त्या क्षेत्राला अप्रत्यक्ष ज्या सवलती दिल्या गेल्या आहेत त्या काढून टाकण्यात याव्यात. आणि उचलून व पैशात मांडलेल्या सवलती दिल्या जाव्यात. त्या शक्यतो कमी असाव्यात. वीज स्वस्त, ऑक्ट्रॉय नाही, म्युनिसिपल कर कमी असेल. ज्याचा रकमेत हिशोब होत नाही ते प्रकार टाळले जावेत. व त्याऐवजी या सर्व गोष्टींची किंमत घ्यावी व दुबेरजी हिशेब करण्यासाठी ती रक्कम त्या त्या उद्योगात गुंतवणूक म्हणून दाखवावी. त्याचप्रमाणे कुणालाही मध्यम स्वरूपापर्यंत कुठेही व्यवसायाची परवानगी हवी. हल्ली बऱ्याच बाबतीत परवाने कमी होत चालले आहेत. पण ते केवळ आतासारखे काही विशिष्ट बाबतीत असलेच पाहिजेत. त्याखेरीज बाकीच्या क्षेत्रात सर्वांना स्वातंत्र्य हवे. मक्तेदारी व जीवघेण्या स्पर्धेमुळे नुकसान हे दोन्हीही टाळले पाहिजे. उद्योगधंद्यांची गळचेपी होत आहे ही आपल्याकडील ओरड अनाठायी आहे. त्याचबरोबर या धंद्यात भांडवल

येण्यासाठी एक मूलभूत सुधारणा व्हायला हवी आहे. पूर्वी ज्यावेळेला काही वर्षांनी पंधरा, वीस, पंचवीस, तीस टक्के लाभांश मिळेल अशी परिस्थिती होती तेव्हा पहिल्या काही वर्षांसाठी व्याज नाही मिळाले तरी चालेल असा धोका पत्करून भागभांडवल घालायला (Risk Capital) भागधारक पुढे येत. पण आता जर नवीन कंपन्यांना यापुढे पंधरा-सोळा टक्क्यावर लाभांश देणे जमणारच नाही तर Equity Capital पाठीमागील भूमिकाच संपते. त्यामुळे नफा होवो अगर न होवो कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे चार टक्के बोनस दिलाच पाहिजे असे बंधन आहे तसेच नफा होवो अगर न होवो भागधारकांना बँकेतील मुदतठेवीवर मिळते त्यापेक्षा एक टक्क्याने कमी एवढे व्याज मिळाले पाहिजे अशी दुरुस्ती कायद्यात झाली तर भांडवल पुरवठ्यात फार अडचण येणार नाही. अन्यथा ही रक्कम बँकात ठेव म्हणून आली असे धरले तरी बँकांना तेवढे कर्ज या उद्योगांना देता येणारच नाही त्यामुळे ही दुरुस्ती महत्त्वाची ठरेल. याचबरोबर बँकातील ठेवी वाढण्यासाठी अनेकविध प्रयत्न व्हायला हवेत. सिलोनमध्ये परवा जुन्या नोटा बदलताना बँकेतील खात्यांचा माध्यम म्हणून उपयोग केला गेला. तो प्रयोग आपल्याकडेही करायला काहीच हरकत नाही. त्यायोगे अवैध मार्गाने फिरत असलेला पैसा बराच बाहेर येईल. (अर्थात तो सोनेचांदी वगैरेसारख्या बाबतीत गुंतून राहून बाहेर येणार नाही. हीही एक शक्यता दृष्टीआड करता येणार नाही.) पण अशी धाडशी उपाययोजना केल्याखेरीज सध्या गत्यंतर राहिले नाही. सोन्यात गुंतवणूक झाली तर त्यावर मार्ग म्हणून रेडिओचा जसा परवाना धारण करण्यासाठी फी घेतली जाते तशी आपखुशीने सोनं जाहीर करून त्याचा परवाना काढण्यासाठी किमान मर्यादेच्या पुढे कर किंवा फी स्वरूपात उत्पन्न गोळा करता येईल. सोनं कमी जाहीर केलं तर कर वाचेल पण कधीतरी मग न जाहीर केलेल्या सोन्याच्या जप्तीची वेळ येईल अशी भीती बाळगून लोक आहे त्यापेक्षा जास्तच सोनं जाहीर करण्याचं स्वातंत्र्य घेतील व असा कर खुशीनं भरतील. तसं झालं तर दर वर्षी पंचवीस कोटी रुपये कर मिळेल व तो उत्पादकबाबीत गुंतवता येईल.

अर्थात वरील बाबी ज्यात समाविष्ट आहेत त्यासारखा कुणी जाहीरनामा काढला तर मते मिळणार नाहीत हे स्पष्ट आहे. पण वेगवेगळ्या तऱ्हेने अर्थार्जन केल्याखेरीज आपण ज्ञान व विज्ञान यात प्रगतीसाठी लागणाऱ्या योजना आखूच शकणार नाही. म्हणून निदान नंतर तरी राज्यकर्त्या पक्षाला अशा तऱ्हेचा विचार करावा लागेल व त्याची सूचना लोकांना आधी द्यावी लागेल. त्याचप्रमाणे जिथे जरुरी नाही तिथे वातानुकूलित व्यवस्थांची सिनेमागृहे वगैरेसारखा अनावश्यक व डोळ्यात खुपणारा खर्च टाळला जाईल अशी तयारी दर्शविली पाहिजे. दरडोई पाचशे रुपयांवर महिना खर्च होणार नाही (प्रवास वगैरे बाबी सोडून) असंही काही बंधन खर्चावर घातलं पाहिजे. दरडोई राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा एका व्यक्तीने

एका दिवसात याहून किती खर्च करायचा ! अर्थात या बाबीबरोबर एका ठराविक रकमेच्या वर पगार मिळवणारांचा पगार गोठवणे, किंमती वाढणार नाहीत म्हणून त्या बाबतही अशीच किंमती गोठवण्याची उपाययोजना करणे महत्त्वाचे ठरेल. काही झाले तरी दरवर्षी साडेतीन ते चार टक्क्यांवर किंमती वाढणार नाहीत याची दखल घेण्यासाठी हे जरूर आहे. न्यूझीलंडसारख्या छोटचा देशानेही हा प्रयोग सध्या चालू ठेवलेला आहे. तेव्हा आपल्या देशात त्याची अंमलबजावणी करण्यास प्रत्यवाय असू नये. किंमती वाढल्यावर 'वस्तू' संपावर जात नाहीत यासाठीही कडक अंमलबजावणी हवी.

या तऱ्हेच्या सर्वांगीण उपक्रमांचा एकच उद्देश असला पाहिजे. म्हणजे किमान गरजांची पूर्ती करण्यासाठी जी जीवनमानाची पातळी लागते तिथपर्यंत बहुसंख्य समाजाची प्रगती लौकरात लौकर करणे. अर्थात इतर सर्व बांधणीप्रमाणे यात मनुष्य बांधणीचीही फार मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे. अज्ञान, भ्रम, व गैरसमज यामुळे आपल्या समाजात पांगळे लोकच फार निर्माण झाले आहेत. आपल्या कार्यात आपण जीव ओतून काम केलं पाहिजे. कामाचा हक्क असला पाहिजे असं म्हणताना दिलेलं काम प्रामाणिकपणे शिस्तीने व भरपूर प्रमाणात केलं पाहिजे याची जाणीवपूर्वक शिकवण द्यायला हवी आहे व त्यासाठी यापुढील शिक्षणपद्धतीतही ताबडतोब आमूलाग्र बदल करायला हवा आहे. आपल्याकडे शिक्षणानं ज्ञानही मिळत नाही नि नोकरीही मिळत नाही किंवा स्वावलंबी होण्याची शक्तीही प्राप्त होत नाही. त्यासाठी सर्व थरातील लोकांना विद्यापीठ-पूर्व शिक्षण उत्कृष्ट शाळातून विनामूल्य मिळालं पाहिजे व ते थोड्याच विषयात पण विज्ञानाची ओळख देणारं व स्वावलंबन शिकवणारं असलं पाहिजे. शिक्षणातील भेद नष्ट झाले पाहिजेत. हा प्रयत्न झाल्याखेरीज व राजकीय व आर्थिक विचारसरणीला सामाजिक प्रगतीची जोड मिळाल्याखेरीज आपण प्रगत राष्ट्रांच्या तोडीला जाऊ शकणार नाही.

अशा तऱ्हेची विचारसरणी असलेला जाहीरनामा काढणं आज खरं पाहिलं तर आवश्यक आहे. आपल्याकडील मतदारांना केवळ आकृष्ट करून मग पाच वर्षे सत्ता भोगणे हाच उद्देश पक्षांच्या जाहीरनाम्यामागे नसावा. तर त्यासाठी धडाडीची पावलं टाकायची आमची तयारी आहे असं तो निर्भीडपणे सांगणारा असावा आणि आमचं परराष्ट्रीय धोरण, व अन्य धोरणं या किमान कार्यक्रमाला मदत करणारी ठरतील अशीच आखली जावीत. त्यासाठी कदाचित आजच्या लोकशाही समाजवादात थोडं जास्त डावीकडं झुकावं लागेल. पण अन्यथा प्रगती खुंटल्यामुळे समाजवादी लोकशाहीकडे अपरिहार्यपणे जावं लागू नये म्हणून असं बुद्धिपुरस्सर झुकणं स्वागतार्हच ठरेल. कारण आजची निकड तीच आहे.

□ □ □

# दीपावलीची रौप्यसंध्या

युगाचे पंचवीस केशरी दिवे प्रज्वलित करून, चित्रकार दलालांच्या 'दीपावली' प्रकाशनाने आगेकूच सुरू केली आहे. नयनरम्य सजावट, सुबक मांडणी आणि दर्जेदार साहित्य ह्यांचा त्रिवेणी संगम म्हणजे 'दीपावली'चा चित्तवेधक दिवाळी अंक, असं रसिकांना सतत पंचवीस वर्षं घोकायला लावण्याची किमया दलालांनी करून दाखवली आहे. त्यांचा चहाता वर्ग मोठा. समाजाच्या अनेक थरात पसरलेला. सर्वांची इच्छा होती की 'दीपावली'ला पंचवीस वर्षं झाली, दलालांच्या यशस्वी कलाजीवनालाही पस्तीस वर्षं उलटून गेली, तेव्हा त्यांच्या हितचिंतक मित्रांनी एक समारंभ करावा, खाण्यापिण्यावर ताव मारत मारत दलालांचं थोडं कौतुक करावं. पण दलालच आडवे आले. म्हणाले, 'तुम्ही भली सोबत केलीत. मीच एक हॅपी इव्हिनींग करतो. तुम्ही या.' आजच ती दलालांची हॅपी इव्हिनींग–सोनसंध्या, आहे; किंवा 'दीपावली'ची रौप्यसंध्या, असंच म्हणूया.

'दीपावली' प्रारंभी वार्षिक होतं. नंतर मासिक झालं. पुन्हा ते वार्षिक करूया, आता दगदग झेपत नाही, वगैरे नाउमेद करणारी भाषा दलाल कितीही बोलत असले, तरी ते खरं नाही. सध्या वाङ्मयीन मासिकांचे धंदे ओहोटीला लागलेले असले नि महिन्याच्या महिन्याला मनाजोगतं साहित्य पुरवणं अशक्यप्राय झालेलं असलं, तरी वाचकांच्या मनावर स्वतःच उमटवलेली स्वतःच्या मासिक प्रकाशनाची गगमुद्रा पुसून टाकणं दलालांसारख्या कलावंताला जमणे नाही. ते हे चक्र चालूच ठेवणार. निदान, त्यांच्या सराईत कुंचल्यात डोळे निववणारी रंगाची जादू आहे, तोपर्यंत तरी.

दलाल अस्सल गोवेकर. मडगावच्या सारस्वत कुळात सोळा साली त्यांचा जन्म झाला. घरच्याघरीच चित्रकलेत प्रगती करून घेऊन पोटापाण्यासाठी आणि चित्रकलेतली पदवी घेण्यासाठी ते मायपोट मुंबईला आले. बी. पी. सामंत ह्या सलामीच्या जाहिरात कंपनीत ते उमेदवार म्हणून चिकटले. ती नोकरी चालू असतानाच, गिरगावातल्या केतकरमास्तरांच्या क्लासात नाव नोंदवून बाहेरून जी. डी. आर्ट झाले. नंतर प्रदर्शनात बक्षिसे खिशात घालण्याचा आणि चित्रकलेची, विशेषतः

**सांस्कृतिक मुंबई । रवींद्र पिंगे**

राजकीय व्यंगचित्रे रेखाटण्याची प्रात्यक्षिके करून दाखविण्याचा, त्यांचा एक लघु-उद्योगच सुरू झाला. मुंबईतल्या चित्रकलाशिक्षणाचा तोंडावळा बदलणाऱ्या आणि नवकलेच्या ताज्या वाऱ्यासाठी जे. जे. स्कूलच्या खिडक्या सताड उघड्या ठेवणाऱ्या जेरार्डसाहेबानेही दलालांची पाठ थोपटली. बदल्यात दलालांनी तिथल्या तिथे त्याच साहेबाचे व्यंगचित्र काढून दिलं ! सामंतांच्या जाहिरात कंपनीत दलालांनी दहा वर्षं कुंचला भिजता ठेवला. त्यावेळी एका खिशात ते पगार ठेवत नि दुसऱ्या खिशात नोकरीचं राजीनामापत्र !

तेव्हापासून ते आजपावेतो, ताफ्ट दलालांची मान ताठ आहे. 'दीपावली' वार्षिक काढावं ही शक्कल मुळात रॉय किणीकरांची. दलालांनाही हौस आणि उमेद होती. जोडीस तारुण्यातली रग वगैरे जिन्नस होते. रंग कामातल्या प्राविण्यामुळे चार ठिकाणी पत होती. त्या जोरावर 'दीपावली'चा पहिला वार्षिक अंक भपक्यात निघाला. दलालांनी दिलचस्प चित्रं काढली. जाहिरातींसाठी स्वतः पायपीट केली. त्याचे फळ म्हणून पहिल्याच अंकाला सव्वाशे पानांच्या जाहिराती आल्या ! अंक अव्वाच्यासव्वा फुगला. त्याची जुंपणी नि बांधणी होता होता मुहूर्तही टळला. दिवाळी संपल्यावर चार दिवसांनी तो बाजारात उगवला. आणि हे सगळे जीवघेऊ साग्रसंगीत सोपस्कार होऊनही चार हजार कॉपी हातोहात संपली ! ही झाली व्यावहारिक बाजू. मराठी साहित्याला 'दीपावली'ने दिलेली अमोघ देणगी म्हणजे पु. भा. भावे, पं. महादेवशास्त्री जोशी आणि स. आ. जोगळेकर ह्या तीन कथाभास्करांचा कथालेखक म्हणून झालेला जन्म. त्याच्या अगोदर भावे जळजळीत राजकीय लेख लिहायचे, पं. महादेवशास्त्री कुमारांशी कूजन करायचे नि जोगळेकर जुन्या वाङमयाची बाडं वाचायचे. त्यानंतरच्या दिवाळी अंकात ह्या समर्थ त्रिकूटासाठी सर्वच मासिकवाले मानाची पानं राखून ठेऊ लागले. 'दीपावली'ने शीड उभारले. पु. ल. देशपांड्यांचं उत्तम लेखन तिथेच रुजलं. अनेक लेखकांना साहित्यात ठळकपणा दिला तो 'दीपावली'ने. उदाहरणादाखल गोपाळकृष्ण भोबे, बाळ सामंत, अच्युत बर्वे, शां. शं. रेगे, सिनिक, प्र. श्री. नेरूरकर, अरविंद ताटके, अशी 'सत्यकथे'च्या कम्पौंडात कृतार्थ शतपावल्या न घातलेल्या गुणी मंडळींची नामावळी सादर करता येईल. मध्यंतरी 'दीपावली'चा हिंदी अवतार प्रसिद्ध करून लेखकांना नवी दिशा दाखवली. संगीतविषयक खास अंक दरसाल सातत्याने काढत आले, हीसुद्धा दलालांच्या जमेचीच बाजू. त्यानिमित्ताने त्यांनी कसबी लेखकवर्ग जमवला आणि लिहिता केला. आता मांडवाखालच्या सावल्या सर्वत्रच विरळ—विरळ होत चालल्यामुळे काही मंडळी फुटली, काही रेंगाळली, काही स्तब्ध झाली, वगैरे चालायचंच. पण दलालांचा स्टुडिओ हा अनेक पांथस्थांना छायेचा मांडव काही काळ तरी झाला होता हे खरंच.

दलालांनी तसे खटाटोपही बहुत केले. काही लाभांशाच्या आशेने, काही त्यातल्या

किक्मुळे, पण बहुतेकदा मित्रांनी निष्ठेने खोल पाण्यात उतरवल्यामुळे. पैकी, दलालांनी साईबाबांवर सिनेमा कसा काढला आणि पुढे त्या सिनेम्याचे, नि 'दिग्दर्शक आणि निर्माता' अशी जाहिरात झालेल्या दलालांचे काय झाले, दैवाने कशा गिरक्या घेतल्या, जिथें बहार उडायची तिथें प्रहार कसे झाले, वगैरे चित्रकथा सांगायला एका रात्रीचा अवसर हवा आणि ऐकणाऱ्यात पुन्हा खो-खो हसत मिनिटागणिक टाळी मागणारे दलालच हवेत! 'कारण स्वकष्टार्जित अशा हजारो रुपयांच्या शुद्ध पत्रावळी झाल्यावरसुद्धा झाल्याप्रकाराकडे विलक्षण अलिप्ततेने पाहाण्याची आणि उदासीनतेने मन झाकोळू न देण्याची किमया ह्या चित्रकाराकड जरूर आहे. कालच ते मला आपला 'ट्रिपल पूल' थोडक्यात कसा हुकला नि तो असा काठाकाठाने हुकल्यामुळे कुठल्या प्रकारच्या रोमॅन्टीक आनंदाच्या झिणझिण्या आल्या नि शिवाय त्यातच खरी किक् कशी आहे, हे मला दिलखुलासपणे सांगत होते. मध्यंतरी त्यांना महाराष्ट्र लॉटरीचं अक्षरी रुपये पन्नास फक्तचं पारितोषिक अचानक कसं लागलं, तोही किस्सा उगळून झाला. अशा गप्पा त्यांच्या स्टुडीओत नेहमीच चालतात. किंबहुना, 'दीपावली'चं हपीस हा मुंबईतला एक साहित्यिक अड्डा आहेच. एकेकाळी ग. दि. माडगूळकर, भावे, पु. ल., मं. वि. राजाध्यक्ष, गोपाळकृष्ण भोबे वगैरे बुजूर्गांनी तो गाजवलाही होता. एका बाजूला दलाल कागदावर कुंचल्याचे तडाखेबंद फटकारे मारीत आहेत, समोर गोष्टीवेल्हाळ लेखक मंडळींनी पुराण सोडलेलं आहे आणि दुसरीकडे गिऱ्हाईकांशी व्यवहाराच्या रोखठोक चर्चा चालल्या आहेत, असं दृष्य केनेडी ब्रिजवरच्या दलाल आर्ट स्टुडीओत हमेशा दिसतं.

कलावान् असले तरी दलाल रोखठोक आहेत. दक्ष आहेत. लेखकमित्रांची ते आब राखतात. मात्र त्यांना मिंधे करीत नाहीत. त्याची त्यांना गरजही नाही. त्यांची कुंडली त्यांच्यापुरती बलवत्तर आहे. धनवान् गिऱ्हाईकांनासुद्धा तिथल्या तिथे चापतात. अहो, हे फार अडचणीचं कर्म आहे. पण दलाल भीडमुर्वत न ठेवता ते उरकतात. आपली ताठ मान ते वाकवतात फक्त गुणीजनांसमोर. ना. श्री. बेंद्रेंच्या रंगमिलाफाला त्यांचा वाकून सलाम आहे. आणि गोव्याच्या त्रिंदादमास्तरांसारखी चित्रं काढायला तर केवळ ईश्वरी अनुग्रह घेऊनच जन्माला आलं पाहिजे अशी त्यांची धारणा आहे.

हे झालं दलालांचं स्वतःपुरतं स्वगत. 'दिपावली'च्या निमित्ताने त्यांच्या आतबाहेर करणाऱ्या आमच्यासारख्या बघ्यांना वाटतं की दलालांसारखी सर्व ढंगांची चित्रं वायुवेगाने काढून दाखवायला आणि ती चितारता चितारता 'दिपावली'चा रथ पंचवीस वर्षं मिरवत न्यायलाही दैवी दयेचा हुंकार लाभायला हवा. ह्याच हुंकाराचा दुसरा पुरावा म्हणजे सौ. सुमतीबाई यजमानांसारखंच नितळ रंगकाम करतात आणि कु. प्रतिमा वडीलांचाच कित्ता गिरवीत आहे.

□ □ □

## नसती उठाठव

सु. ल. सोमण

# घोडदौड

हो ना करता करता अखेर लोकसभा विसर्जित केली गेली. मुदतपूर्व निवडणुकांची घोषणा झाली. विभिन्न पक्षांच्या प्रचारसभांना आता ऊत येईल. ोटचा छोटचा वृत्तपत्रांचं पेव फुटेल. निवडणुकांच्या दिशेने घोडदौडीला प्रारंभ होईल. ह्या शर्यतीत भाग घेणाऱ्या घोडचांना अर्थातच, अडीच-तीन महिने जंगी तयारी करावी लागणार आहे. आणि एवढं करूनही घोडा 'वीन'ला आला तर ठीक; नाहीतर आहेच हरी हरी!

महालक्ष्मी किंवा पुण्याच्या रेसकोर्सवर धावणारे घोडे आणि दिल्लीच्या रोखाने दौडू पाहणारे हे घोडे ह्यात आहे बरेच अंतर. महालक्ष्मीवरचे घोडे बिचारे 'वीन'ला येऊनही आपल्या धन्याच्या शब्दाबाहेर जाऊ शकत नाहीत. धन्यानं केलेलं प्रेम, व्यक्त केलेला विश्वास ह्यांना तडा जाऊ न देण्याची ते शिकस्त करतात. निवडणुकांच्या रिंगणातनं 'वीन'ला येऊन दिल्लीला किंवा कुठल्याही राजधानीच्या शहरी पोचलेल्या घोडचांची तऱ्हा मात्र मोठी और असते. बेटे चक्क, त्यांच्या यशाला जबाबदार असलेल्या जनतेकडे, पाठ करून चौफेर उधळू लागतात. घटकेघटकेला रंग बदलू लागतात. सर्वसामान्य जनता मग म्हणत राहते, 'माजलेत लेकाचे!' अर्थात असं करताना, हे घोडे समाजवादाची भाषा मात्र मोठी मिठ्ठास बोलतात हं! ते तरी काय करणार म्हणा? समाजवाद तोंडी घोळवायला पाहिजे, नाहीतर जनता झुकवता येणार नाही. आणि मोटार तरी निदान जमली पाहिजे. नाहीतर वीनला येण्यासाठी खर्चलेले हजारो रुपये पाण्यात जाणार – अशा कात्रीत बिचारे ते सापडतात. मग आहेच सकाळी 'वैष्णव जन तो...' आणि रात्री आमदार निवासातला 'कॅबरे!'

# बूर्झ्वा लेकाचे

लोकसभेच्या होऊ घातलेल्या निवडणुकांसाठी म्हणे बारा कोटी रुपये खर्च होणार आहेत. ही काय बातमी म्हणायची? निवडणुका होणार, त्याही समाजवादी धोरणाच्या अंमलबजावणीसाठी, जनतेचा कौल मागण्यासाठी, ही खरी महत्त्वाची बातमी. तीसाठी होणारा खर्च ही क्षुल्लक बाब. आणि तरीही बेटे

काही अर्थज्ञ, दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्न जेमतेम साडेतीनशे रुपयांच्या घरात असणाऱ्या भारताला हा जादा निवडणुकांचा खर्च डोईजड तर होणार नाही ना असल्या शंका काढीत बसले आहेत. लोकसभेबरोबरच विधानसभांच्याही निवडणुका झाल्या तर निवडणूक खर्च शंभर कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे. परंतु एवढाले आकडे समोर ठेवून उगाच बाऊ दाखवण्यात काय हशील आहे? निवडणुकांद्वारे केवढे अटीतटींचे प्रश्न सोडवायचे आहेत. उदाहरण घ्यायचं झालं तर राजा-महाराजांच्या तनख्यांचा व हक्कांचा प्रश्न. ह्यामुळे जनतेच्या डोक्यावरील पाच-साडेपाच कोटींचा बोजा कमी होणार आहे; शिवाय त्यांची मिरासदारी नाहीशी होऊन समाजवादाचं पाऊल पुढे पडणार आहे. गोवा, मणिपूर, पहाडी राज्य ह्यासारखी छोटी छोटी राज्यं निर्माण करता येऊन कितीतरी मंत्री उपमंत्री निर्माण होऊन समाजवाद वृद्धिंगत होणार आहे. आता ह्यासाठी, जनतेच्या काही पैशांचा चुराडा झाला तर काय हरकत आहे. तसा तो, आणखी दीड वर्षाने होणारच नव्हता का? तेव्हा जनतेला, संस्थानिकांना एरवी जाणारा पैसा मिळवून देण्यासाठी, जनतेच्या काही कोटींवर पाणी सोडणं अव्यवहार्य मुळीच नाही. मग ते अर्थज्ञ, काही का म्हणेनात!

ह्या अर्थज्ञांचा दुसरा दावा असा की, सध्या भारताची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे. ह्यावेळी जनतेवर हा वाढीव बोजा लादणं म्हणजे आर्थिक अरिष्टाला आमंत्रण देणं आहे! साफ झूट. हे अर्थज्ञ बेटे जनतेला उघड उघड फसवू पहात आहेत. घाबरवून सोडत आहेत. परवाच श्रीमती इंदिराजींनी पत्रकार मुलाखतीत ठणकावून सांगितलं की आर्थिक आघाडीवर सबकुछ आलबेल आहे. किंबहुना भारतात इतकी चांगली आर्थिक परिस्थिती कधीच नव्हती असं त्यांनी सांगितलं. देशाच्या पंतप्रधान असं निःसंदिग्धपणे सांगत असताना, त्यांच्याच सरकारच्या पैशावर जगणाऱ्या ह्या अर्थज्ञांनी साफ बंडला माराव्यात, ह्यासारखा निमकहरामीपणा कुठला असू शकणार? सगळे चोर लेकाचे!

आता महागाई भडकलेली आहे; बेकारी वाढली आहे; चलन फुगवटा वाढूनही गुंतवणूक घसरली आहे; रुपयाचं व्यावहारिक मूल्य घटलं आहे; निर्यात घटली आहे; आयात कमी झालेली नाही...हे सगळे घडले आहे हे कबूल. पण म्हणून अर्थव्यवस्था बिघडली आहे कशावरून? ते शक्यच नाही. खुद्द पंतप्रधानदेखील तसंच सांगतात. यशवंतरावजीसाहेबसुद्धा तसंच बोलतात. अर्थव्यवस्था शाबूत आहे नि तरीही वर उल्लेखिलेलं घडलं. अर्थातच ह्यामागे काहीतरी काळंबेरं आहे. बूर्झ्वा लोकांनी भांडवलवाल्यांशी लागेबांधे सांधून समाजवादी सरकारविरुद्ध कृष्णकारस्थान रचलं आहे हेच खरं! उद्योगपतींनी बोकारो, भिलई वगैरे ठिकाणच्या सरकारी पोलाद कारखान्यांचा आदर्श न उचलता, कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादनाचं धोरण ठेवलं म्हणूनच बेकारी वाढली आहे. त्यांना त्या लुच्च्या!

सिंडिकेटवाल्यांनी पाठिंबा दिला आहे. जनसंघी, संसो–प्रसोवाले 'राष्ट्रवादा'चा जप करून आर्थिक आघाडी कोसळवू पहात आहेत. ह्यांच्याचमुळे बेकारी वाढली, महागाई भडकली, रुपया घसरला. ह्या बुज्वांना फेकून द्या, बघा अर्थव्यवस्था सुरळीत चालू लागते की नाही, शासकीय पोलाद व्यवसायाच्या पावलावर पाऊल टाकून ?

## वे टू सेक्युलॅरिझम

परवा दक्षिण मुंबईतल्या एका साहेबाच्या शाळेत घडलेला प्रसंग. नाताळनिमित्त सर्व विद्यार्थ्यांना शाळेत बोलावण्यात आलं होतं. त्यात अर्थात विद्यार्थिनीही आल्याच. शाळेतल्या बाई होत्या 'मॉडर्न'. त्यांनी नाताळच्या समारंभासाठी येणाऱ्या विद्यार्थिनींसाठी खास पोषाख ठरवून दिला. लुंगी व त्यावर अंगरखा. बांगड्या, कुंकू इत्यादींना रजा द्यायचीही पोषाखात सक्ती होती. ओष्ठशलाका (सोपा पर्यायी शब्द–लिपस्टिक ! ) लावायला मात्र मुभा होती. विद्यार्थिनी अर्थातच ह्या पोषाखात आल्या, आणि 'नाताळ'च्या समारंभाला मजा आली.

पण एका पोरीचे पालक मात्र चक्रम निघाले. त्यांनी ह्या सक्तीचा निषेध तर केलाच, पण मुलीला कार्यक्रमालादेखील जाऊ दिले नाही. ते म्हणाले, "उघड उघड ख्रिस्ती धर्म लादता येत नाही म्हणून आडमार्गाने विद्यार्थ्यांच्या मनातनं त्यांच्या धर्माविषयीची, संस्कृतीविषयीची अनास्था निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे..."

हा चक्रमपणाच नाही का ? ह्या सेक्युलर राज्यात ख्रिस्ती शाळा असं काही धर्म लादण्यासाठी करतात हे समजणंच अशक्य आहे. उकट कुंकू, बांगड्या, मंगळसूत्र वगैरेंमुळे एखाद्याचा धर्म समजून येतो व त्यामुळेच सेक्युलरवादाला बाध येतो. वास्तविक बाईंनी केलं तेच योग्य होतं. धर्मांधतेच्या बुरसट कल्पना झुगारून देऊन, लुंगी-कुडत्याच्या आधुनिकतेकडे मुलींना नेताना बाईंनी सेक्युलरवादाची फार मोठी सेवाच केली आहे.

आणि खरं म्हणजे ह्या देशातल्या हिंदुंनी सेक्युलरवादाची पार वाट लावून टाकली आहे. त्यांच्या उद्धट वागण्यामुळे, विरोधामुळे उगाचच जातीयवाद देशात बोकाळतो आहे. नाहीतर आता पाकिस्तानात कुठे जातीयवादी झगडे आहेत ? नागालॅण्ड वगैरे भागात नुसतीच चर्चेस आहेत तर तिथनं कधी कुठे जातीय दंगे झाल्याच्या बातम्या येतात ? ह्या भारतातच ही कीड आहे. आणि त्याचं एकमेव कारण इथले 'हिंदू' हेच खरं ! आणि ही कीड वाढवायला आता ते गोरे "हरे कृष्ण...कृष्ण हरे"वाले उपटले आहेत.

पृष्ठ ४२ वर

# एक संध्याकाळ अशी—

अशीच एक संध्याकाळ.

शहरातील मध्यभागी असलेलं आझाद मैदान.

साडेपाचच्या कचेरीतून घरी जाणारा मध्येच दोन मिनिटे थांबतो. चार – दोन वाक्ये ऐकतो आणि चालू लागतो असे दृश्य दिसते आहे. लाऊडस्पीकरमधून वक्त्यांची जोरदार भाषणे ऐकू येतात. स्वार्थसाधू राजकारणात ओढला गेलेला एक तरुण टाय बांधून हिंडतो आहे. पत्रकार खुर्च्यांवर बसून रिपोर्टिंग नावाची गोष्ट करीत आहे. एका स्थानिक वृत्तपत्रातली झाडून सर्व मंडळी वेठीला धरल्यासारखी घोटाळत आहेत. दोन प्रेस फोटोग्राफर्स उगाचच इकडून तिकडे धावत आहेत. आणि या साऱ्या गदारोळात वारेमाप नेतेमंडळी उभी आहेत. बरेचसे बघे आहेत. निरीक्षक म्हणविणारे आहेत आणि टवाळखोरही आहेत.

'सर्व पक्षीय सभा म्हणे ही !'

'सर्वपक्षीय डावे.'-एक जनसंघ.

'यु. गो. नाही याच्यात ?'

'अरे, कसा येईल, हे तत्त्वभ्रष्टांचे राजकारण.' एक माणूस चिडून उद्‌गारतो.

साहेबासारखा दिसणारा सूटाबूटातला एक 'क्रिस्तांव' मधून मधून वक्त्यांना उच्चारू नयेत अशा शिव्या हासडतो आहे.

'हांका जोत्या व्हाणानी मारू जाच. मंत्री आसताना किते केले हाणी !'

'काय साहेब, सभेला ?' हा माझा प्रश्न ऐकताच एक 'गव्हर्मेंट सर्व्हंट' नामक प्राणी 'छे : छे :' करीत सुरवंटासारखा पळ काढतो.

'काही अर्थ नाही. नेहमीचेच.'

असे म्हणत काढता पाय घेणाऱ्यांचे चेहेरे बघत मधून मधून भाषणाकडे कान देत मी सरपटत रहातो.

या सभेत भाई नारायण देसाई बोलले.

साथी शिवाजी देसाई बोलले.

काँ. (कॉम्रेड नव्हे) अन्थनी डिसूझा व गोपाळराव मयेकर बोलले.

वीर मोहन रानडे बोलते झाले.

आणि टिळक–आगरकरांची परंपरा सांगणारे पत्रकार म्हणून श्री. माधव गडकरीही बोलले, 'मी पैसा मिळवितो आणि दान करतो असे बांदोडकर म्हणतात. समाजवादाच्या या युगात हा पैसा हे पापदान आहे. जनतेने ते स्वीकारू नये.'

# मिळवा!

# 5%

कर-मुक्त
व्याज

## सप्तवर्षीय राष्ट्रीय बचतपत्रें

ही अत्यंत चांगली गुंतवणूक आहे. तिच्यामुळें 5 टक्के करमुक्त व्याज मिळते. परंतू तुम्ही खाली दर्शविल्याप्रमाणें अधिक प्राप्ती मिळवणाऱ्या गटांतील असाल तर तुमचा व्याजाचा दर प्रत्यक्षांत खालील प्रमाणें पडेल.

| तुमची प्राप्ती | मिळणारा व्याजाचा दर |
|---|---|
| रु. 20000 | 6.37 टक्के |
| रु. 30000 | 7.99 टक्के |
| रु. 40000 | 9.39 टक्के |
| रु. 50000 | 14.71 टक्के |

अधिक तपशीलासाठी टपाल कचेरीत चौकशी करा.

**राष्ट्रीय बचत संघटना**

davp 70/368

'मुख्यमंत्र्यांचे गोव्यातील राज्य हे फॅसिस्ट राज्य आहे. त्यांना भांडवलदारांचा पाठिंबा आहे.'–'आमदारांचे मतदारांच्याबाबतीत काही कर्तव्य आहे.'–'आपल्यापुढे मुंडकरांचा प्रश्न आहे.'–श्री. डिसूझा.

'वैचारिक पुनरुत्थान, निश्चित ध्येय, तत्त्वाचे प्रेरित होऊन'–आदी अगडबंब शब्दजंजाळ श्री. मयेकरांनी वापरले. मात्र 'तत्त्वासाठी बांदोडकरांना सोडले' असे सांगणारे श्री. मयेकर तत्त्व कोणते तेच सांगत नाहीत.

या सभेत नवीन काहीच नाही अशी धारणा होत होती. मन उगाचच वळवळ करीत होते आणि एवढ्यात टिळक–आगरकरांचे नाव ऐकू आले म्हणून मी कान टवकारले.

दै. गोमन्तकाचे संपादक श्री. माधव गडकरी बोलत होते.

'संपादक या नात्याने नव्हे तर एक पत्रकार म्हणून मी उभा आहे...मराठी वृत्तपत्रव्यवसाय व राजकारण ही नेहमी हातात हात घालून पुढे गेली...टिळक आगरकर, परांजपे, प्रबोधनकार ठाकरे या संपादकांची परंपरा मी चालू ठेवली... तीच परंपरा चालू ठेवण्यासाठी मी लेखणी उचलली...मुख्यमंत्री सालाझारच्या पावलावर पाऊल टाकून संपादकांनी काय करावे व काय करू नये हे सांगू पहातात...'

इतका वेळ गप्प राहून भाषणे ऐकणारा माझ्या शेजारचा एक माणूस मात्र आता संतापून उठला.

'चोर लेकाचे. बांदोडकरांना सालाझार म्हणतात. हेच तर पूर्वी मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर जाऊन मासळीवर ताव मारत होते. आणि बांदोडकरांची स्तुतिस्तोत्रे गात होते.' ...हळूच तेथून पुढे सरकलो.

'काहो, टिळकांची हीच का ती परंपरा? टिळकांनी तीन वर्षे ब्रिटिशांची सेवा केली होती? आणि...'

त्यांचे प्रश्न संपतच नव्हते.

## दुसरी संध्याकाळ अशी–

अशीच ही दुसरी संध्याकाळ. उसवलेली. स्थळ तेच आझाद मैदान. वेळ तीच. माणसे वेगळी. काही तीच. यातही हौशे, नवशे, गवशे होतेच.

या गर्दीत खूप सुंदर चेहरे होते. सोन्यानं मढवलेल्या श्रीमंतांच्या बायका होत्या. नाजक पावले टाकीत, आकर्षक चेहरे दाखवीत मोठ्या मोठ्या गाड्यातून आलेल्या अनेक नवयौवना होत्या.

प्रदर्शन होते? माणसाचे? छे:!

स्वत:ला भगवान समजणारे श्रीसत्यसाईबाबा येणार होते. मोठ्ठे व्यासपीठ

होते. सुंदर गालीचा होता. मखमली उशा होत्या. बाबांनासुद्धा हे सारे हवेच!

भजन चालले होते. माणसे येत होती.

एवढ्यात सायरन वाजला. राजाधिराज नकूलसेन महाराज--नायब राज्यपाल आले. पुढे पोलिसांची गाडी-त्यांच्यासमवेत श्रीसत्यसाईबाबा उतरले.

पुढे काय झाले ते सांगावयास नकोच.

भरल्या पोटी आत्मानुभूतिबद्दल प्रवचन झाले. जादूगारासारखे चार-दोन चमत्कार झाले.

हे सत्यसाईबाबा पंधरा दिवस राजभवनात नायब राज्यपालांचे पाहुणे म्हणून राहिले. तेवढ्या अवधीत सारी सरकारी यंत्रणा त्यांच्यासाठी राबली. माहिती-खाते पत्रके काढीत होते म्हणे.

नायब राज्यपाल असे निस्सीम भक्त झाल्यावर मग काय? अनेक सरकारी अधिकारी निष्ठावान् सेवक बनले. बढती, पगारवाढीसाठी. राज्यपाल खूष व्हावे म्हणून-अनेकांनी राजभवनात मुक्काम ठोकला. सारा गोमंतक या कालावधीत बाबांच्या नावानेच उद्घोष करीत असल्याचा प्रत्यय अनेक भक्तांना झाला.

मध्यंतरी बाबा आजारी पडले. डॉक्टरांची धावाधाव सुरू झाली. कारण, म्हणे एका भक्ताचा आजार त्यांनी स्वतःवरती घेतला.

दै. गोमंतकने यावर सडकून टीका केली. सरकारच्या पैशातून बाबांची ऊठबस चालली होती. एकेकाळी गोव्यात आलेले लोकसभेचे सभापती श्री. गुरु दयालसिंह धिल्लां यांना राजभवनात राहू देण्यास नकार देणारे हेच नकूल सेन सत्यसाईंच्या भजनासाठी राजभवनचा नोकरवर्ग राबवीत होते.

मला अशीही बातमी मिळाली आहे की, आन्ध्र प्रदेशात जे पुट्टपर्थी नावाचे स्थान आहे तेथे जाऊन येण्याचा खर्च या राज्यपालांनी सरकारच्या माथी मारला. आणि ऑडिट खात्याने त्याला हरकत घेतली.

एक खरे की, येथील शासनयंत्रणा त्यासाठी राबत असलेली आम्ही प्रत्यक्ष पाहिली. □ □ □


स्वादिष्ट मिठाईसाठी

आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

**दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.**



# शून्य

कु. प्रतिभा जोशी

पापण्या थरथरत असतात. ती कितीतरी वेळ खिडकी-बाहेरच्या फुललेल्या गुलमोहरा-कडे पाहात असते. दोन-तीनच चुकार फांद्या एकमेकींना अंग घाशीत मजेत हवेवर झुलत असतात. गुलमोहराच्या लालीत विरघळून गेल्यासारखं वाटतंय. हिरव्या पानांच्या पसाऱ्यात सुस्तावून पसरल्यासारखं वाटतंय...

'बाई झालं.' ती चमकून मान वळवते आणि भानावर येते. आपण वर्गात आहोत.

एक विद्यार्थी वही घेऊन येते. तिच्या कपाळावर सूक्ष्मशा आठया पसरतात. ती भराभर खूणा करून वही विद्यार्थ्याला परत देते. नंतर लागोपाठ चार-पाच विद्यार्थी वह्या घेऊन येतात. काही मुलं उगाचंच गोंधळ करीत असतात. ती त्यांच्यावर खेकसते. क्षणभर वर्गात शांतता पसरते. तिची नजर परत खिडकीकडे वळते. ती कष्टाने वही उघडून त्यावर नजर टाकते. छे:, बघावसं वाटत नाही. उगाच इकडे तिकडे रेघा मारून ती सही ठोकते. इतक्यात बेल वाजते. भर्रकन विद्यार्थ्यांचा थवा वर्गाबाहेर उडतो. ती रुमालाने घाम टीपीत खुर्चीवर बसते. विद्यार्थी गोंगाट करीत व्हरांड्यातून पळत असतात. टेबलावरल्या वह्या पर्समध्ये टाकून ती साडी झटकीत उठते. आता घरी जायचं? छे: इथंच बसावसं वाटतंय. असंच खिडकीबाहेर पाहात. असंच आळसावून हिरव्या पानांवर अंग झोकून द्यावंसं वाटतंय. ती परत खुर्चीवर बसते आणि टेबलावर डोकं टेकविते. डोक्यालाच मुंग्या आल्या आहेत. मेंदू बधीर झाल्यासारखा वाटतोय. मुलांचा गोंगाट हळूहळू कमी होतोय. अनेक मैलांवरून निरनिराळे ध्वनी कानावर आदळल्यासारखे वाटताहेत. खोल दरी आहे...आपण त्यात पडलो तर? तर काय होणार? नाही कसं? तुझे काका, काकू? हं! ते माझे कोण आहेत? नाही की हो? हो की नाही? ज्यांनी जन्म दिला ते तर मला केव्हाच सोडून गेले आहेत. एक आवंढा. ती झटकन वर बघते. उठायला हवं. ती ताडकन उठते आणि वर्गाबाहेर पडते. चेहरा तेलकट झालाय. त्यावरून रुमालसुद्धा फिरवावासा वाटत नाही. व्हरांडा ओलांडून ती गेटबाहेर पडते. घरी जायचं की आणखी कुठे? आणखी कुठे जाणार? कोण आहे तुझं? तो सर्वसाक्षी परमेश्वर नक्कीच आहे. देव? हं! देव गाढव आहे. मूर्ख आहे. हं! इडियट!!

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।


डोंगरे बालामृत

रोडवरचा गोंगाटही नकोसा वाटतोय. माणसं आहेत की भुतं आहेत ही ? सहज तिचं लक्ष डाव्या बाजूला जातं. अरे ? देवसुद्धा एकटाच आहे की देवळात ! चला त्याला भेटून यावं झालं. ती गेट ओलांडून ओटयावर येऊन देवाला नमस्कार करते. कुठला आहे हा देव ? गणपती की मारुती ? कुणी का असेना. देव आहे झालं. अशा दगडाला सगळे हात जोडतात, मग मला का हात जोडीत नाहीत सगळे ? मीसुद्धा दगडच आहे की. ती उगाचच हसते. ओठांवर विखाराची छटा— आपण कधीही देवळात जात नाही. मग आजच का आलो ? जाऊ द्या. उत्तर कशाला शोधायचं. ती ओटयावर थोडंसं टेकल्यासारखं करून उठते. बापरे, घर अजून किती लांब राहिलं आहे ! घर म्हणण्यापेक्षा खुराडं म्हटलेलं बरं. तिथं जाऊन तरी काय ? तोच गोंगाट. चाळ म्हणजे एक गोंगाट—गोंगाट म्हणजे एक चाळ. हीसुद्धा देवाची अनेक रूपं का ? देव जाणे !...

पावलं जड पडत आहेत. एक एक पावलाखाली जमीन दबतेय. दबलेल्या जागी मातीचे किती कण असतील ? एक...दोन...तीन...पावलांना संख्या नाही. रस्त्याला लांबी नाही—. अनंत ! रस्त्याच्या वेगात पावलांचा वेग मिसळतोय... एका संध्याकाळी या पावलांबरोबर आणखी मोठी पाऊलं पडत होती. आकाशाची निळाई चार डोळयांमध्ये विरघळली होती...त्या पावलांचा रस्ता कधीच बदल-लाय...चाळ केव्हा आली कळलंच नाही. आता एवढे जिने कुणी चढायचे ? खालच्या पायरीवर ती क्षणभर उभी राहाते. चढायलाच पाहिजे. पायऱ्या किती आहेत ? असंख्य. वळणं ? असंख्य. वरून जया धडाधडा जिना उतरतेय. सेंटचा भपका तिला विळखा घालतो. ती जयाच्या रंगवलेल्या ओठांकडे पाहाते. हं ! हेही एक लाईफ आहे ! कुठल्या ऑफिसात जाते, केव्हा जाते, पत्ता नाही. ती आवंढा गिळते. जयाच्या स्मिताला उत्तर दिलंच पाहिजे. "Good evening Jaya !" जया गालांना खळया पाडीत निघून जाते. तिची ओढणी अजून हवेवर तरंगतेय.

कुठे चालली असेल ही ? कुठे का जाईना ! शेजारचा दरवाजा उघडतो. जॉनी डिसूझाची नजर तिच्या अंगावरून सरसरते. ती आज सरळ त्याच्याकडे पाहाते, त्याच्या काळया ओठांकडे. तिला आणखी गंमत वाटते. गंमत, कुतूहल-ती आणखी पायऱ्या चढते. चवथ्या मजल्यावर ब्लॉक. बापरे. ती वर येऊन थांबते. दम लागलेला असतो. दाराला कुलूप ? हं ! गेली असतील कुठे तरी. ती दार उघडून आत येते. पर्स टेबलावर भिरकावते. खिडकीतल्या गुलाबाकडे ती टक लावून बघते. खुर्चीवर आपण केव्हा बसलो, हेही तिला कळत नाही. बाहेर गोंगाट चाललाय. या चाळीत काय नाही ? सगळं आहे. आहे मला नको असलेलं सगळं आहे. ती उठून धाडकन दरवाजा बंद करून येते. आणि टेबलावर डोकं टेकून बसते....तू कोण आहेस ? मी ? मी तीचं. वाटत नाही ना ? ओठ दुमडतात. मनुष्याचं जीवन असंच असतं का ? हं. असेल. कोण मनुष्य ? कुठलं जीवन ?

कुठली नाती ? शून्य. तुझं जीवन असलंच तर वह्या, विद्यार्थी, नोटांचे तुकडे, काका, काकू आणि तुझ्या अंगा अंगाला चावणारी बधीरता. समजलं ? या शून्यातून तुला कधीच बाहेर येता येणार नाही. का ? का ?—याला उत्तर नाही. पूर्वी होतं. कुणी दिलं होतं ? ती डोळे घट्ट मिटून घेते. काय हक्क होता कुणाला उत्तर देण्याचा ? प्रश्न—उत्तर—प्रश्न—मोठं शून्यच आहे. प्रत्येक क्षणाला नवं शून्य निर्माण होताना मागचं शून्य विसरून जायचंय. ती तारवटल्या डोळ्यांनी वर बघते. इतक्या लवकर काळोखाची पुटं घरावर का चढली ? दिवस...रात्र... दिवस शून्यच ! अंधार खोलीला कुरतडतोय. मला तो कुरतडेल का ? ती शहारते. डोळ्यासमोरून गुलमोहराच्या फांद्या सळसळून जातात. काय होतंय आपल्याला ? काही नाही. काही नाही. झालं तरी तसं होता कामा नये. ती सहज पेन्सिलीने पॅडवरच्या कागदावर गोल गोल रेघोट्या मारायला लागते. बरं वाटतय जरा. रेघांना आकार येतोय. एक गोल...दोन गोल...गोल म्हणजे काय ? शून्यच. संख्या वाढत चालली आहे. रेघांचा गुंता वाढत चाललाय. गुंता—शून्य—गुंता. शून्याचा खोल शेवाळला डोह खुणावतो आहे. झोक जातोय त्यात श्वास कोंडलाय. काही तरी संवेदना. या शून्यात बरंच काही दिसतंय...अंधाराची डहाळी त्या डोहावर झुकलीय....तिच्यावर गाल घासावासा वाटतोय. गाल ? कुणाचा ? ती थरारते. तो...तो...कुठे असेल आता ? छे: ! शून्य. भकास. रेघोट्या वाढतात. आणखी खोल डोह होतोय. खोल...खोल...अंधाराची डहाळी झुकतेय...झुकतेय... तिने पाण्याला स्पर्श केलाय...डोह उसळतोय. आई ग ! ...थंडगार पाणी अंगाला चावतंय. ती गच्च डोकं धरते....अंगाला भिनायला डोह उसळतोय—उसळतोय.





# पर्ल हार्बर

विनय कुबेर

लेखांक : तीन

अमेरिकन नेते जपानच्या हल्ल्याबाबत बेसावध राहिले याचे एक मुख्य कारण असे संभवते की अमेरिकेच्या सामर्थ्याची जाणीव असल्यामुळे जपान तिला युद्धाचे आव्हान देण्याचे धाडस करणार नाही असे अमेरिकन नेत्यांना वाटत असावे. परंतु जपानच्या धीटाईबद्दलचा त्यांचा अंदाज साफ चुकला !

अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांनी जपानच्या पर्ल हार्बरवरील चढाईची शक्यता सरकारला कळविली होती. एवढेच नव्हे तर या चढाईपासून संरक्षण करण्यासाठी कित्येक योजनाही त्यांनी सुचविल्या होत्या.

अमेरिकन नौदल सचिव फ्रँक नॉक्स १९४१ जानेवारीमध्ये युद्धमंत्री हेन्री स्टिम्सन यांना लिहितो, 'जपानने आपल्याविरुद्ध युद्ध पुकारलेच तर त्याचा प्रारंभ पर्ल हार्बर नाविक तळावरील छुप्या विमानहल्ल्याने होईल याबद्दल मला मुळीच संदेह वाटत नाही.'

फेब्रुवारी १९४१ मध्ये जपानमधील अमेरिकन वकिलाने परराष्ट्रखात्याला कळविले होते, 'जपान व अमेरिका यांचे संबंध आणखी बिघडल्यास पर्ल बंदरावर छुपा हल्ला होईल अशी बातमी एका महत्त्वाच्या जपानी व्यक्तीकडून मिळाली आहे. ती बरीच विश्वसनीय वाटते. तशी कुजबुज बऱ्याच ठिकाणी कानावर येते.'

इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारा हा संदेश परराष्ट्रखात्याने जसाच्या तसा संरक्षणखात्याकडे पाठविला. परंतु प्रशांत महासागरातील नौदलप्रमुख ॲडमिरल किमेल याचेकडे त्याची प्रत पाठविताना संरक्षणखात्याने त्याला खालील पुस्ती जोडली—'आरमाराचा गुप्तहेरविभाग या अफवांबद्दल साशंक आहे. जपानी आरमाराचे सध्याचे सामर्थ्य व त्याच्या हाती सध्या असलेल्या मोहीमा यांचा अभ्यास करता ते पर्ल हार्बरविरुद्ध अशी हालचाल करेल हे अशक्य वाटते. निदान नजीकच्या भविष्यकाळात असा हल्ला होण्याची शक्यता दिसत नाही.'

तथापी याच महिन्यात ॲडमिरल किमेलने प्रशांत महासागरातील आरमारातर्फे वरिष्ठांना पाठविलेल्या अहवालात 'युद्धाच्या घोषणेपाठोपाठ पर्ल बंदरातील अमेरिकन जहाजावर जपानचा अचानक हल्ला होऊ शकेल.' हे गृहीत धरले होते.

त्याच वेळी तीन चतुर अमेरिकन सेनाधिकाऱ्यांनी या हल्ल्याचे भविष्य अचूक वर्तविले होते. विमानदलातील कर्नल फार्दिगने हवाईमधील वैमानिक संरक्षणासबंधीच्या व्यवस्थेची पाहणी करून काही मौलिक सूचना केल्या होत्या. त्याने म्हटले होतें, 'सहा विमानवाहक नौकांचा उपयोग करून जपानी नौदल पर्ल हार्बरवर चढाई करील असे वाटते. यशस्वी चढाईसाठी पहाटेची वेळ अत्यंत योग्य ठरेल व ती उत्तरेकडून होऊ शकेल.'

या चढाईचा वेळीच छडा लावण्यासाठी त्याने अनेक संरक्षक योजना सुचविल्या होत्या. 'दिवसा हवाई बेटासभोवती संपूर्ण ३६० अंशातून कायम जागता वैमानिक पहारा ठेवावा' असे त्याने म्हटले होते. त्यासाठी हवाईमधील विमानदलाला बी–१७ डी जातीची अगर तेवढ्याच पल्ल्याची चार इंजिनांची दुसऱ्या एखाद्या प्रकारची १८० विमाने देण्याची शिफारस त्याने केली होती.

या योजना प्रत्यक्षात आल्या असत्या तर जपानला पर्ल हार्बरवरील चढाई चांगलीच महागात पडली असती. परंतु त्याच्या सुदैवाने अमेरिकन संरक्षणखाते हवाईमधील विमानदलाला असे १८० 'उडते किल्ले' देऊ शकले नाही. उपलब्ध असलेली बी–१७–डी जातीची बरीच विमाने फिलीपाइन्स, ब्रिटन व अटलांटिक महासागरात गुंतली होती. जपानी हल्ल्याच्या दिवशी हवाईत या प्रकारची फक्त

१२ विमाने होती.

१९४० च्या उन्हाळ्यात अमेरिकन हेरखात्याने त्याच्या क्षेत्रात एक महत्त्वाचा विजय संपादन केला. त्यांनी जपानच्या गुप्तसंदेशपद्धतीची फोड केली. त्यामुळे योशिकावाच्या हवाईमधील हेरगिरीत आपली कोणती रहस्ये फुटतात हे त्यांना समजू लागले. हवाई व वॉशिंग्टनमधील जपानी हेरांचे स्वदेशाशी चालणारे गुप्त बिनतारी दळणवळण अमेरिकन हेरखात्याला उपलब्ध होऊ लागले. परंतु हे सर्व गुप्त संदेश बराच काळ गुप्त खजिन्याप्रमाणे पडून रहात. पकडलेल्या संदेशांचा भला मोठा ढिगारा कित्येक आठवडे भाषांतरावाचून पडलेला असे. शत्रूचे पकडलेले गुप्त संदेश उपयोगासाठी योग्य त्या व्यक्तींकडे झटपट पोचविणे ही हेरगिरीच्या तंत्रातील अत्यावश्यक गोष्ट असते. उशीर तेथे घातकी ठरतो. अधिकाऱ्यांची कामातील दिरंगाई व संदेशांचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तींना गुप्ततेत ठेवण्यासाठी घेतली जाणारी अतिरेकी दक्षता यामुळे अमेरिकन हेरखात्याचे या संदेशांबद्दलचे काम फार रेंगाळत सुरू असे. या संदेशांचा अतिप्रसार झाल्यास जपान्यांना त्यांची गुप्तसंदेश-पद्धत फुटल्याचा संशय आला असता व त्यांनी दुसरी नवी पद्धत वापरण्यास प्रारंभ केला असता. हे टळावे म्हणून सरसकट सर्वच संदेश लष्करी अधिकाऱ्यांना उपलब्ध करून दिले जात नसत. कित्येकदा अधिकाऱ्यांना या माहितीची आवश्यकता असूनही ती मिळत नसे. खुद्द ॲडमिरल किमेलपर्यंत अशी 'जादूची अक्षरे' फारच थोडया प्रमाणात पोचली.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी सर्वसामान्य अमेरिकन व जपानी नागरिकांचे एकमेकांशी क्वचितच संबंध येत. अमेरिकनांची जपान्यांकडे पाहण्याची दृष्टी काही प्रमाणात तुच्छतेची होती. या कर्तबगार पौर्वात्य राष्ट्राबद्दल अनेक भ्रामक समजुती त्यांच्यात पसरल्या होत्या. त्यांना जपानी मनुष्य अत्यंत दुर्बल, निरुपद्रवी व विदूषकी मनोवृत्तीचा भासे. उद्योगी, सुशिक्षित, गोल फ्रेमचा चष्मा लावणारा, किरकोळ शरीरयष्टीचा जपानी मंदबुद्धीचा व निव्वळ अंधानुकरणप्रिय असला पाहिजे अशी त्यांची कल्पना होती. स्वतःला फार हुशार समजणारे अमेरिकन शरीरशास्त्रज्ञ तर म्हणत–जपानी वंशातील लोकांच्या डोळ्यांच्या विशिष्ट रचनेमुळे ते कुशल वैमानिक कदापी बनू शकणार नाहीत !

१९३० मधील अमेरिकन राजनैतिक अहवालात तर एक अत्यंत भ्रामक आणि हास्यास्पद विधान करण्यात आले होते. 'जपान्यांच्या कानांची अंतर्रचना सदोष असते, त्यामुळे त्यांना स्थिरत्वाची ( Equilibrium ) फसवी जाणीव होत असावी !'

जपानच्या सैनिकी सामर्थ्याबद्दलही त्यांच्यात असेच गैरसमज होते. जपान हा निव्वळ 'कागदी वाघ' आहे, त्याची विमाने गुंतागुंतीच्या यंत्रांची निष्फळ जाळी आहेत, जहाजे अवजड आणि जुनाट आहेत. एकाच मोठ्या युद्धात जपानच्या

साम्राज्याची शकले होतील !"

अमेरिकन जनमानसात जपानी राष्ट्राची ही प्रतिमा निर्माण होण्यासही काही कारणे होती. जपानमधील लाकूड व पुठ्ठ्यांच्या इमारतींनी बनलेली शहरे प्रभावी बाँबहल्ल्यांना अत्यंत योग्य ठरली असती. जपानचे सर्व तरुण रक्त चिनी युद्धात नदीप्रमाणे व्यर्थ वहात होते ! त्यामुळे त्याला लष्करीदृष्टया अत्यंत अपायकारक असा ' रक्तक्षय ' झाला होता. त्याने आपणहून अमेरिकेस युद्धाचे आव्हान देणे ही त्याची ' राष्ट्रीय आत्महत्या ' ठरेल असे अमेरिकनांना वाटावे यात फारसे नवल नव्हते !

कोटयावधी डॉलर्स खर्च करून अमेरिकेने प्रशांत महासागरात उभारलेला बुरुज (पर्ल हार्बर नाविक तळ) चिरेबंदी आहे असे सर्व अमेरिकन अभिमानाने सांगत. जपानी हल्ल्यांच्या ' रक्तलांछित रविवारापूर्वी ' सुमारे ९ महिने अमेरिकन नौदल सचिवाने पर्ल हार्बरबाबत सांगितले–' उत्तम भौगोलिक रचना, अप्रतिम बंदर, साधनसामुग्रीच्या पुरवठ्याची उत्कृष्ठ व्यवस्था आणि संरक्षणाचा कडेकोट बंदोबस्त या वैशिष्ठ्यांमुळे पर्ल हार्बरचे नाविक ठाणे जगात अद्वितीय आहे !' ६ सप्टेंबर १९४१ रोजी क्लार्क बीच हा अमेरिकन पत्रकार लिहितो–जपानची पर्ल हार्बरवरील चढाई यशस्वी होणे केवळ लाखातून एकदाच शक्य आहे. सर्व जाणते तज्ञ व हौशी राजनीतीज्ञ उच्चरवाने सांगत होते पर्ल हार्बर हे प्रशांत महासागरातील जिब्राल्टर आहे !

जपान्यांची जाज्वल्य देशनिष्ठा व धाडसी वृत्ती अमेरिकनांना ठाऊक असती तर त्यांनी पर्ल हार्बरबाबत अशा बढाया मारल्या नसत्या !

शिवाय दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापासूनच अमेरिकन जनतेचे लक्ष अटलांटिक महासागर व युरोपमधील रणधुमाळीवर खिळले होते. ४ सप्टेंबर रोजी अमेरिका अप्रत्यक्षपणे त्यात गोवली गेली. त्यादिवशी एका जर्मन पाणबुडीने अमेरिकन विनाशिकेवर आईसलँड बेटानजीक अचानक टारपेडो हल्ला चढविला. त्या दिवसापासून अमेरिकन वृत्तपत्रात युरोप व अटलांटिकमधील युद्धासंबंधीच्याच्या बातम्या पहिल्या पानावर ठळक अक्षरात झळकू लागल्या. जपानी चाळयांच्या बातम्यांना गौण महत्त्व मिळाले. त्यांची वृतपत्रांच्या शेवटच्या पानावर हकालपट्टी झाली.

हिवाळ्याच्या अखेरीस एखाद्या जादूगाराने कोंडी फिरविल्याप्रमाणे परिस्थिती अचानक पालटली ! अटलांटिकमधील वाढत्या युद्धसदृश परिस्थितीतही शांतपणे स्वतःची तटस्थता सांभाळणाऱ्या अमेरिकनांच्या पर्ल हार्बरच्या अभेद्यतेच्या वल्गनांचा फुगा ७ डिसेंबरला फुटला ! पर्ल हार्बरच्या खळबळजनक बातमीमुळे वृत्तपत्रांच्या प्रथम पानावर अग्रभागी जपानचे नाव पुन्हा झळकू लागले !

सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवडयातच ॲडमिरल किमेलने अमेरिकन सागरी हालचालींचा सूत्रधार ॲडमिरल स्टार्क याला बजावले होते–प्रशांत महासागरातील

परिस्थिती आता इतर जगाहून फारशी वेगळी राहिलेली नाही. कोणत्याही क्षणी तेथे युद्धाचा भडका उडू शकेल ! परंतु अॅडमिरल स्टार्कने या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले. पर्ल हार्बरवर छापा घालण्याचे धाडस जपानी आरमार करील असे त्याला व्यक्तिशः वाटत नव्हते !

सर्वसाधारण अमेरिकन लोकमतही असेच होते. त्याचे लक्ष अटलांटिकमधील युद्धावरच खिळले होते. त्यामुळे आपले परसदार उघडेच राहीले आहे याचे भान त्यांना उरले नाही !

हत्यारे पाजळली !

सप्टेंबरच्या शेवटी कमांडर जेंडाने त्याच्या वैमानिकांना पर्ल हार्बर युद्धासाठी खास शिक्षण देण्यास प्रारंभ केला. हे काम भलतेच कठीण होते. मोहिमेबद्दल अत्यंत गुप्तता बाळगणे आवश्यक होते. त्यामुळे वैमानिकांना या खास शिक्षणाचे उद्दिष्ट उघडपणे सांगता येणार नव्हते !

उंचावरून बाँबफेक करणारी विमाने, सूरमारी बाँबर्स, टारपेडोफेकी विमाने व लढाऊ विमाने यांचे एक मोठे दल तयार करण्यात आले. एकाच वेळी केवळ ४०-५०च नव्हे तर शेकडो विमानांना रेखीव ताफ्यात (Formation) शिस्तीने उडण्याचे शिक्षण द्यायचे होते. युद्धप्रसंगी आवश्यक असलेले उड्डाणकौशल्य साध्य करण्यासाठी फारच थोडा वेळ शिल्लक होता. प्रत्येक क्षण मोलाचा होता.

एका अत्यंत तरबेज वैमानिकाला या दलाचा नेता निवडणे आवश्यक होते. त्याचा त्याच्या विमानांवर कमालीचा ताबा असायला हवा होता ! नेतृत्वाचे असामान्य गुण व अपार सहनशीलता त्याच्या अंगी असणे महत्त्वाचे होते ! जेंडाला त्याचा वर्गमित्र कमांडर फुशिडा याच्यात हा असामान्य नेता गवसला !

वयाच्या ४० व्या वर्षी सुद्धा फुशिडा अत्यंत चपळ व कार्यक्षम वैमानिक होता ! अत्यंत कामसू अधिकारी अशी त्याची ख्याती होती. चिनी युद्धातील ३००० तासांचा प्रदीर्घ विमानोड्डाणांचा अनुभव त्याच्या पाठीशी होता. त्याचे उड्डाणकौशल्य अद्वितीय होते. त्याचे विमान हा जणू त्याच्या शरीराचाच एक अवयव बनला होता ! पर्ल हार्बर मोहिमेची कल्पना हे त्याला नवेच आव्हान होते. ते त्याने मोठ्या आत्मविश्वासाने स्वीकारले ! जेंडा व फुशिडा ही जोडी एकमेकांना फार पूरक ठरली. जेंडाच्या तल्लख बुद्धीने निर्मिलेल्या कल्पनांचे फुशिडाने सोने केले !

केवळ अफाट बुद्धिमत्ता नेतृत्वाला पोषक ठरेलच असे नाही. सफल नेतृत्वासाठी स्वतःच्या सहकाऱ्यांमध्ये मिळून मिसळून वागावे लागते. त्याच्या सद्‌गुणांचा उपयोग करून घेऊन ते वाढीस लावावे लागतात, तर त्यांचे दुर्गुण नष्ट करण्यासाठी झटावे लागते. स्वतःबद्दल त्यांच्या मनात निष्ठा निर्माण करावी लागते. कित्येक असामान्य बुद्धिमान व्यक्ती या नेतृत्वगुणावाचून जन्मभर एकलकोंड्या राहतात. त्यांच्याभोवती जमणारी मंडळी केवळ स्वार्थसाधू व स्तुतीपाठक असतात. त्यांना

त्यांच्या नेत्यांबद्दल आदर जरूर वाटेल. पण ती त्याला नीट समजून घेऊन प्रसंगी निष्ठेने साथ देतील की नाही याचा भरंवसा नसतो. मग दोघात केवळ एकमेकांच्या स्तुतीचा एकच दुवा प्रबल बनतो. असामान्य बुद्धिमान असलेला कमांडर जेंडा हा याच प्रकारात मोडत होता.

परंतु फुशिडा मात्र लोकांना लोहचुंबकाप्रमाणे स्वतःकडे खेचून घेण्यात जन्मजात पारंगत होता. त्याच्या सहकाऱ्यांचे त्याच्यावर अत्यंत प्रेम होते. त्यांनी फुशिडाला त्यांची निष्ठा वाहिली होती. त्याच्या शब्दाखातर त्यांनी वाटेल ती असाध्य गोष्ट साध्य करण्यास स्वतःच्या प्राणांचीही बाजी लावली असती ! पहिले वैमानिक नौदल हे जपानी आरमाराचे हृदय होते. त्यातील सैनिक अत्यंत संवेदनाशील, कर्तबगार व धैर्यशाली होते. अशांना हाताळण्याचे काम अत्यंत कठीण असते. परंतु फुशिडा या स्फोटक द्रव्याची हाताळणी सुलभतेने करू शके. रणांगणात या कर्तबगार सैनिकांचे नेतृत्व करण्यास तो अत्यंत योग्य होता. जेंडाची स्वप्ने त्याने आपल्या सहकाऱ्यांसह प्रत्यक्षात आणली !

जेंडाने वैमानिकांकडून अपेक्षिलेली कामगिरी अत्यंत बिकट होती. वैमानिकांना बाँबफेक करण्यासाठी लक्ष्यावर झेप घ्यावी लागे. पूर्वीच्या २००० फूट उंचीऐवजी १९५० फुटांवरून बाँब टाकण्यात येऊ लागले. त्यामुळे वैमानिकांना शत्रूच्या विमानविरोधी तोफांच्या भडिमाराच्या कक्षेतूनच उड्डाण करावे लागणार होते ! फुशिडाचे निर्भय वैमानिक या कसरतीचा सराव करू लागले,

उंचावरून लक्ष्यावर अचूक बाँबफेक करणे अत्यंत अवघड असते. अमेरिकेत 'नॉर्डेन बाँबसाईट' येथे अशा शिक्षणासाठी खास व्यवस्था केलेली असे. जपानमध्ये अशी खास सोय नव्हती. जपान्यांची नेमबाजी साधी नजर व बाँब सोडण्याचा अचूक क्षण निवडण्याचे नैसर्गिक कौशल्य यावरच अवलंबून होती. वैमानिकांचे या प्रकारातील कौशल्य फारच असमाधानकारक होते. चीनमध्ये शत्रूकडून कसलाही हवाई विरोध नसतानासुद्धा त्यांची नेमबाजी १० टक्क्याहून कमी प्रमाणात यशस्वी होई. ही गोष्ट फारच निराशाजनक होती. परंतु फुशिडाला निराशा ठाऊक नव्हती. तो प्रयत्नदेवाचा प्रामाणिक पुजारी होता. त्याने प्रत्येक विमानपथकाच्या नेतेपदी एकेका तरबेज नेमबाजाची नेमणूक केली. लढाईच्या सरावात कुठल्याही पथकातील घटकांची फाटाफूट होऊ नये याची त्याने काळजी घेतली. त्यामुळे वैमानिकांना त्याच्या नेत्यांच्या कार्यपद्धतीची व स्वभावांची चांगली ओळख झाली. त्यांच्यात आपुलकीचे मैत्रीचे वातावरण निर्माण झाले. सहकार्याची भावना वाढीस लागली. हळूहळू सर्वच पथकाचे कौशल्य, शिस्त व एकी यात सुधारणा दिसून येऊ लागली. इझुमी येथे हा सराव कितीतरी दिवस सुरु होता. विमानांच्या अविरत घरघरीमुळे कोंबडयांनी अंडी देणे बंद केल्याच्या तक्रारी स्थानिक शेतकऱ्यांकडून शेवटी शेवटी येऊ लागल्या !

फुशिडाच्या अफाट मेहनतीमुळे जपानी वैमानिकांनी उंचावरून बाँबफेक करण्यात चांगलेच कौशल्य संपादन केले. ऑक्टोबरअखेर त्याने बाँबफेकीची स्पर्धा घेतली. जोराच्या वाऱ्यात नागमोडी चालीने प्रवास करणारे वेगवान जहाज लक्ष्य म्हणून निवडले होते. वैमानिकांचे ५० टक्के नेम अचूक लागले. त्याच ५ विमानांच्या पथकाने नांगरून ठेवलेल्या (स्थिर) जहाजावर ८० टक्के यशस्वी नेमबाजी केली. जपानी सागरी विमानदलाच्या युद्धक्षमतेत त्यामुळे भरीव सुधारणा झाली!

गेंडाने फुशिडाला या युद्धयोजनेची माहिती देताना अमेरिकन जहाजांवर टारपेडो हल्ले करताना येणार असणाऱ्या अडचणींचीही कल्पना दिलेली होती. अमेरिकन जहाजे किनाऱ्याजवळ ओळीत जोडी जोडीने नांगरून ठेवलेली असत, त्यामुळे ओळीतील आतल्या जहाजांवर टारपेडो फेकणे शक्य होणार नव्हते. जहाजे नांगरून ठेवण्याची जागा फारच अरुंद होती. बाहेरच्या ओळीतील जहाजापासून समोरचा किनारा फक्त १६०० फूट अंतरावर असे, शिवाय विरुद्ध बाजूच्या किनाऱ्यावर उंच उंच याऱ्या व गोदीतील इतर उंच अडथळे होते.

या ठिकाणच्या पाण्याची खोली फक्त ४० फूट होती. विमानांनी अगदी पाण्याच्या पृष्ठभागाला चाटून सूर मारले असते तरीसुद्धा येथे नेहमीचे टारपेडो निरुपयोगी ठरले असते. विमानातून सोडल्यावर हे टारपेडो प्रथम पाण्यात ७० फुटपर्यंत खोल बुडत व नंतर पाण्यातून जहाजांच्या दिशेने झेपावत! साहजिकच ते पर्ल बंदरात चिखलात रुतून निरुपयोगी ठरले असते.

उथळ पाण्यात उपयुक्त असे खास टारपेडो निर्माण करण्यासाठी जपानी तंत्रज्ञांचे जोराचे प्रयत्न सुरू होते. फुशिडाने वैमानिकांना टारपेडोफेकीसाठी खास शिक्षण देण्यास प्रारंभ करण्याचे ठरविले.

पर्ल हार्बरची भूरचना व कागोशिमा आखातानजीकची भूरचना यात आश्चर्यकारक साम्य आहे ही गोष्ट फुशिडाच्या चाणाक्ष नजरेने हेरली होती. पर्ल बंदरासमोर फोर्ड बेट होते तर कागोशिमा आखातासमोर ४००० फूट उंचीचा ज्वालामुखी होता. अमेरिकन आरमाराच्या गोदीच्या जागी कागोशिमा शहर होते. या शहरातील उंच उंच इमारती पर्ल बंदरातील इमारती व याऱ्याप्रमाणेच होत्या. म्हणूनच फुशिडाने टारपेडोफेकीच्या शिक्षणासाठी ही जागा निवडली.

हिवाळ्यातील एका निरभ्र सकाळी त्याने टारपेडोफेक्या वैमानिकांना कागोशिमात एकत्र जमविले आणि संभाषणाच्या ओघात एक महत्त्वाची घोषणा चटकन् करून टाकली, 'आजपर्यंत आपण उघडच्या समुद्रामधील चालत्या जहांजावर हल्ला करण्याचे शिक्षण घेतले आहे. आता आपल्याला उथळ पाण्यात स्थिर उभ्या असलेल्या जहाजांवर टारपेडो हल्ला करण्याचा सराव करायचा आहे.'

खास शिक्षणाचे उद्दिष्ट असे उघड सांगणे चांगलेच धोक्याचे होते. वैमानिकांना त्यांच्या अंतिम कामगिरीबद्दलचा अंदाज त्यामुळे लागणे शक्य होते! परंतु फुशिडा हा कसबी नट होता. घोषणेतील रहस्यामुळे मनात असलेली खळबळ चेहऱ्यावर दिसू न

देण्यात तो शंभर टक्के यशस्वी झाला. वैमानिकांना या घोषणेतील गोम कळली नाही.

स्थिर लक्ष्यापेक्षा हलत्या लक्ष्यावर नेम मारणे नेहमीच अवघड जाते. त्यामुळे हे शिक्षण फारसे महत्त्वाचे आहे असे त्यांना वाटलेच नाही.

उथळ पाण्यात वापरण्यायोग्य टारपेडो अजून बनावट स्वरूपातही (Dumy) तयार झाला नव्हता. तो उपलब्ध झाल्यावर व्यवस्थित नांगरून ठेवलेल्या अवाढव्य अमेरिकन जहाजांवर तो अचूक फेकणे फारसे कठीण नव्हते. पण जहाजांनजीक पोचण्याचे काम मात्र कठीण होते. म्हणून फुशिडाने वैमानिकांना जहाजाजवळून सूर मारण्याचे शिक्षण देण्यास सुरुवात केली.

त्याने वैमानिकांकडून अपेक्षिलेल्या हालचाली खरोखर बिकट होत्या ! वैमानिकांनी ६५०० फूट उंचीवर शहरावर उत्तरेकडे जमायचे होते व दक्षिणेकडे आखाताच्या दिशेने झेपावत विमान हळूहळू १३० फुटापर्यंत खाली आणायचे होते !

फुशिडाचे सहकारी आश्चर्याने थक्क झाले. १३० फूटावरून उड्डाण करताना त्यांची विमाने झाडांच्या शेंड्यांना चाटून जाणार होती. विमान चालविताना शिस्त व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून घेणारा त्यांचा नेता त्यांना एका शहरावरून केवळ १३० फूट उंचीवरून उड्डाण करायला सांगत होता ! पण हा धक्का काहीच नव्हे अशा गोष्टी फुशिडा त्यांना पुढे सांगणार होता. किनाऱ्याजवळची उंच इमारत मागे पडल्यानंतर किनाऱ्यावरील तेलाच्या टाक्यावर विमान ६५ फूट उंचीपर्यंत खाली उतरावयाचे होते. त्यानंतर १५० नॉट वेगाने धावणारे विमान त्याच पातळीवर स्थिर ठेवून, किनाऱ्यापासून १६०० फूट अंतरावरील लक्ष्यावर टारपेडोचा मारा करायचा होता.

आता मात्र वैमानिकांचे आश्चर्य संपुष्टात आले ! त्यांची सुप्त जिद्द जागी झाली. या शिक्षणाचा विचार ते गंभीरपणे करू लागले. इतक्या कमी उंचीवर अगदी लहानशा चुकीमुळे अगर अनवधानामुळे त्यांचे विमान थेट समुद्रात कोसळले असते !

फुशिडा पुढे सांगतच होता, "टारपेडो सोडल्यानंतर उजवीकडे वळून जलद उंच चढायचे आणि तळावर परतायचे. ही सर्व हालचाल अत्यंत बिकट आहे. नेम धरण्यासाठी लक्ष्य व तुमचे विमान यात फारच थोडे अंतर असेल. इतक्या कमी उंचीवर विमान एखाद्या उंच वस्तूवर आदळण्याची शक्यता आहे, म्हणून तुम्हाला अत्यंत दक्ष रहावे लागेल. त्याचवेळी साहसही पत्करावे लागेल. एकाचवेळी दक्षता साहस यांचा योग्य संगम साधणारा वैमानिकच यात यशस्वी होईल. अन्यथा त्याचा नाश अटळ आहे. लेफ्टनंट कमांडर मुराटा तुम्हाला या हालचालीचे प्रात्यक्षिक प्रथम करून दाखवील."

त्याने मुराटाला एका बाजूस घेऊन विचारले, 'तुला हे जमेल का ?' त्याला असे विचारणे म्हणजे अट्टल दरोडेखोराला लहानशी भुरटी चोरी करायला सांगण्यासारखे होते ! मुराटा हा इतका कसलेला वैमानिक होता की, परवानगी मिळाल्यास

हीच कसरत त्याने विमान उलटे चालवून (वरचा भाग खाली व खालचा वर) लीलया करून दाखविली असती !

कागोशिमाचे शहरवासी त्या दिवशी आश्चर्याने थक्क झाले ! अनेक विमाने एका पाठोपाठ उत्तरेकडून शहराकडे येत होती आणि घराच्या छपरांना चाटून समुद्राकडे कोसळत होती. एकही वैमानिक या कसरतीला कचरला नाही. फुशिडाचे पूर्ण समाधान झाले.

फुशिडा देहभान विसरला ! त्याला पर्ल हार्बर युद्धाचे दृश्य पहात असल्याचा भास झाला. पेन्सिल्व्हानिया, नेवाडा, सरातोगा, लेक्झिग्टन, अरिझोना वगैरे सुप्रसिद्ध अमेरिकन नौका बंदरात उभ्या आहेत; विमानविरोधी तोफा दणाणत आहेत; विमाने आडवेतिडवे सूर मारताहेत; त्यांनी फेकलेले टारपेडो पाण्यातून फेसाळ मार्ग आखीत जहाजांच्या दिशेने सुसाट झेपावताहेत; ते जहाजावर आदळून फुटताच होणाऱ्या प्रचंड स्फोटाच्या दणक्याने कानांचे पडदे फाटताहेत...

हे शिक्षण आता कागोशिमाच्या नभांगणात दररोज धुमधडाक्याने सुरू झाले. भेदरलेले नागरिक विमानदलाची शिस्त बिघडल्याचे परस्परांना सांगू लागले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वैमानिकांना त्यांच्या मनाप्रमाणे शहराचा सत्यानाश करण्याची मुभा दिली आहे असे ते म्हणत.

दरम्यान जेंडाने आरमाराच्या संशोधन विभागाकडे त्याला आवश्यक त्या प्रकारचा खास टारपेडो तयार करण्यासाठी तगादा लावला होता. तंत्रज्ञांची पथके धावपळ करीत होती. टारपेडो पाण्यात आवश्यक त्या अत्यंत कमी खोलीवर स्थिर व्हावा यासाठी त्यांनी अनेक प्रकारच्या पंखांचा उपयोग करून पाहिला. त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले ! हैराण होऊन वेड्यासारखा शोध करीत असता एका शास्त्रज्ञाच्या मेंदूत एक नवीनच कल्पना अचानक चमकली ! विमाने हवेत ठराविक उंचीवर स्थिर रहावीत यासाठी वापरली जाणारी युक्ती टारपेडोसाठी वापरली तर ?

ताबडतोब या योजनेचे प्रात्यक्षिक करून पाहण्यात आले. अखेर जपानी तंत्रज्ञांनी कालाबरोबरची ही शर्यत जिंकली ! पहिल्या संचातील अर्धेअधिक टारपेडो पाण्यात आवश्यक त्या खोलीवर स्थिर होऊ शकले ! आणखी प्रयोगानंतर ८० टक्के टारपेडो त्यांचे काम चोख करू लागले.

या प्रयोगात बराच कालावधी गेला होता. म्हणून नव्या टारपेडोंच्या उत्पादनास जलद गतीने प्रारंभ झाला. तरीसुद्धा ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत ३५–४० हून अधिक टारपेडो तयार झालेले नव्हते. आवश्यक त्या संख्येतील शेवटचे शंभर टारपेडो आरमाराला नोव्हेंबर अखेरसुद्धा मिळू शकले नाहीत. संरक्षण कारखान्यांतील कामगारांना त्यांची जुळणी करण्यासाठी विमानवाहू जहाजांवरून कुराईल्समधील गुप्त स्थानाकडे जावे लागले.

(क्रमशः)

(आधारित)

**श्रीकांत आंबेकर**

# विज्ञानसृष्टी

**दूरचे तारे । लेखांक आठवा**

## फोटॉन-अग्नियान पुरस्कर्त्यांच्या डोळ्यांसमोर जेव्हा ( ताऱ्याऐवजी ) काजवे चमकतात–...

दूरच्या ताऱ्याचे गूढ विश्व कधी पृथ्वीवासीयांना पहायला मिळेल का ? मानवाला सूर्यमालिकेच्या पुढे, दूर घेऊन जाईल अशी परिचालन यंत्रणा भविष्यात कधी काळी उभारता येईल का ?

'होय. होय ! नक्कीच !!' विलक्षण आशावादी असणाऱ्याचे हे उत्तर आहे. 'केव्हा, कोण जाणे, पण कधीतरी एक दिवस मानव नक्की आपल्या शेजारच्या मित्र ताऱ्यानजीक जाऊन पोहोचेल–कदाचित मित्राच्या ग्रहांवर उतरेलदेखील !' हा आशावाद व्यक्त करीत असताना या आशावाद्यांच्याजवळ पाठबळ असते त्सिल्कोव्हस्कींच्या या उक्तीचे–

'जे जे म्हणून आज अशक्यप्राय दिसते ते ते उद्या सहज शक्य होईल.' आणि लगेच ही मंडळी आपल्या म्हणण्याला सज्जड पुरावे देण्यासाठी नानाविध कल्पना पुढे मांडू लागते.

त्यातल्या त्यात फोटॉन चलनयंत्रे, फोटॉन अग्निबाण आणि फोटॉन अंतरिक्षयान यांची वकिली करणाऱ्यांचा आवाज नेहमीच जरा 'हाय पीच'ला लागलेला असतो. त्यांना सुचवायचे तरी काय असते ?

प्रत्येक अग्नियान हे त्याच्या पुच्छच्छिद्रातून अतीव वेगाने बाहेर पडणाऱ्या झोताच्या प्रत्याघातामुळे परिचालित होत असते. त्याचप्रमाणे फोटॉन अग्निबाणही परिचालित होईल तो शक्तिशाली अशा 'विद्युतचुंबकीय विकिरणपुंजा'च्या झोताच्या प्रत्याघातामुळे ! 'विद्युतचुंबकीय विकिरणपुंज' (electromagnetic radiation quanta) हे दुसरे तिसरे काही नसून फोटॉनची व्याख्या आहे. जास्त सोप्या शब्दात सांगायचे तर फोटॉन म्हणजे फक्त शक्तिसंचय आहे–प्रकाशच तो ! प्रकाशच परिचालक म्हणून वापरण्यामागचा मूलभूत फायदा हा की, त्यामुळे

३,००,००० किलोमीटर्स प्रतिसेकंद एवढी निर्गमन गती सहजी गाठता येईल. ही अत्युच्च गती आहे. अत्युत्साही लोकांच्या नजरेत भरत असलेले हेच तर फोटॉन यानाचे प्रमुख वैशिष्टच आहे. कारण जर अशीच गती गाठता येईल तर आइन्स्टाइनचा काळ-वेगासंबंधीचा सिद्धांत लागू पडून मानवाला दूरच्या ताऱ्यांकडे 'याची देही' जाता येईल. अन् त्यांचे गूढ विश्व 'याची डोळा' पाहताही येईल.

या पायाभूत तत्त्वावर अनेक योजनांची निर्मिती करण्यात आली आहे. साऱ्या योजना यानामध्ये इंधन म्हणून वापरण्यासाठी फोटॉन्सची निर्मिती कशी करावी हे सांगणाऱ्या आहेत. एका योजनेनुसार सरळ सरळ प्रतिद्रव्याचा वापर करण्यास मुभा दिली गेली आहे. ऋणाणुक आणि प्रति-ऋणाणुक (पॉझिट्रॉन) यांच्या संघार्षातून त्यांचा पूर्ण विनाश घडून येऊन गॅमा किरणाबरोबरच फोटॉन्स निर्मिले जातात. नेमक्या याच प्रक्रियेचा पुरेपूर फायदा उठवावा असे प्रस्तुत योजना म्हणते. दुसऱ्या योजनेत असे सुचविण्यात आले होते की प्लाझ्मा टॉर्च वापरून १,५०,०००° सेंटिग्रेड तपमानावर प्रकाशाची निर्मिती करण्यात यावी. याशिवाय नियंत्रित स्वरूपातील अणुऔष्णिक प्रक्रियाही फोटॉन निर्मितीसाठी सुचविली गेली आहे.

जराशा भारून टाकणाऱ्या अशा या तिन्ही योजना आहेत. पण जरा बारकाईने विचार केला तर साऱ्याच कशा फसव्या आहेत हे कळून येईल. पहिल्या योजनेत प्रति-ऋणाणुकांचा पुरेसा साठा असणे जरूरी आहे. तिसऱ्या योजनेत सुचविलेली योजना अजून कल्पनेतच आहे. कारण अजूनही अणुऔष्णिक प्रक्रियेवर पूर्ण नियंत्रण मिळविणे शास्त्रज्ञांना शक्य झालेले नाही. राहता राहिली दुसरी योजना. तीमध्ये निर्देशिलेल्या तपमानापासून अवकाशयात्रिकांना संरक्षण मिळण्यासाठी चांगल्या संरक्षक कवचाचा शोध प्रथम लावायला पाहिजे. थोडक्यात, एकनाथांच्या 'दोन थोटे, एक घडेचिना' अशा तीन कुंभारांसारखीच या तिन्ही योजनांची स्थिती आहे आज तरी !

एकूण, त्याचे असे आहे की, हे फोटॉन पुरस्कर्ते एकदा बोलायला लागले की त्यांचे पाय जमिनीवर ठरतच नाहीत. सतत कुठल्याही दिशेने कल्पनेचे वारू धावडवत सोडायचे हा त्यांचा आवडता छंदच आहे. त्यांच्या या कल्पनाविलासात सारे काही शक्य असते. अडथळे असे नसतातच. असा एखादा फोटॉन पुरस्कर्ता तुम्हाला भेटला तर भंडावून सोडल्याखेरीज राहायचा नाही. पण या प्राण्याला फारसे घाबरायचे कारण नाही. चुकून कुठे 'फोटॉननंदी टाळी' लागलेला इसम भेटलाच तुम्हाला तर तुमच्या ओळखीतील एखाद्या इरसाल संशयात्म्याला सरळ त्याच्यावर छू: करून सोडा (वेळ प्रसंगी जबरदस्त निराशावादीही चालू शकेल !) मग त्यांची अशी जुंपेल, अशी जुंपेल की हाय !!

ही पहा अशीच एक शाब्दिक मारामारी ! संशयात्म्याची अडचणींवर अडचणी काढण्याची लकब आणि बड्या बड्या कल्पनांच्या फुंकरीने त्यांना पाचोळ्यासारख्या

उडवून टाकणाऱ्या फोटॉन् पुरस्कर्त्यांची आगळी करामत कुणालाही गंमतशीर वाटेलच वाटेल ! काही असो, पण अखेरीस मात्र– आत्ताच कशाला सांगू ! तुम्ही स्वतःच ऐका हा सुसंवाद !

पात्रे : अर्थातच एक इरसाल संशयात्मा आणि एक बिच्चारा फोटॉन पुरस्कर्ता.

संशयात्मा : हां हां ठीक आहे, ठीक आहे. झकास आहे हं बाकी तुमची योजना! पण काय हो फुकटंफाकटी एवढ्या प्रचंड गतीने गेलात तरी घडणार आहे काय ?

फोटॉन पुरस्कर्ता : (पुणेरी अध्याहृत यांच्या टाळक्यापर्यंत पोचलेले नाही, बरेच काही. कितीतरी मनोरंजक घटना घडून येतील. ताऱ्यांचे उदाहरण घ्या. ते जसे आता दिसताहेत ना तसे दिसणार नाहीत. त्यांचे दृश्य स्वरूपच पालटून जाईल. यानाच्या मागच्या बाजूला असलेले सारे पीतवर्णीय तारे लाल पडत जाऊन अखेरीस एकदम सारे अदृश्य होतील. हा तर साधा 'डॉप्लर परिणामाचा' परिणाम ! त्यानुसारच यानाच्या थेट समोर असणारे तारे सारे जांभळ्या रंगाने झळाळू लागतील. अन् ज्याप्रमाणे वर्णपटातील दृश्य रंगाचे तारे उपलब्ध आहेत त्याप्रमाणे कुणी सांगावे या अथांग विश्वात इन्फारेड आणि अल्ट्राव्हायोलेट तारेसुद्धा असतील. आता हे रंग अदृश्य आहेत पृथ्वीवर सापेक्षतः स्थिर असणाऱ्यांना. पण फोटॉन यानातून जाणाऱ्या प्रवाशांसाठी मात्र ते अदृश्य न राहता सहजी दिसू शकतील.

संशयात्मा : आँ ? काय म्हणता ? अल्ट्राव्हायोलेट अन् इन्फारेड तारेदेखील पहाणार ? पहा हं पहा ! आम्हालाही फोटो आणून दाखवा म्हणजे झाले आं ! ते असो, पण उल्काच्या संकटाबाबत तुम्ही काय करणार आहात ? म्हणजे काय आयडिया आहेत तुमच्या ?

फोटॉन पुरस्कर्ता : लहान कणरूपी उल्कांपासून संरक्षण करण्यासाठी आम्ही यानाला मजबूत संरक्षक-कवच चढवू आणि तेजस्वी किरण फेकणाऱ्या 'रे गन्स'चा वापर करून मोठ्या उल्कांचा नाश करू.

संशयात्मा : अरेच्चा, तुम्ही, एक गोष्ट अगदी साफ साफ विसरलात की ! असे पहा, एक मिलिग्रॅम वस्तुमानाचा व आघातगती प्रकाशगतीच्या केवळ 0·866 एवढी असणारा लहानसा धूलिकण दहा टन लोखंडाचे झटक्यात बाष्पीभवन करून टाकतो हे ठाऊक आहे ना ? मग ? कसली संरक्षण-कवचाची गोष्ट घेऊन बसला आहात ? अगदी कोणचेही शोधून काढलंत तरी ते संरक्षक-कवच पुरेसे संरक्षक ठरणार नाही.

फोटॉन पुरस्कर्ता : आम्ही विद्युतक्षेत्र निर्माण करून त्याद्वारे यानाच्या जवळ येणाऱ्या उल्कांचे अयनीभवन करून टाकू. अन् मग चुंबकीय क्षेत्र वापरून त्यांना परावर्तित करू.

संशयात्मा : असे म्हणताय ? बराय ? पण नुसत्या उल्काकणांनीच कुठे भागलंय

हो ? त्या धूलिकणांशिवाय अंतरिक्षात हैड्रोजन वायूही आहेच. अंतरिक्षाच्या प्रत्येक घनसेंटिमीटरमध्ये त्याचा एक एक परमाणु भरलेला आहे. म्हणजे असून नसल्यातच जमा अशी परिस्थिती आहे खरी–पण ती मंदगतीने जाणाऱ्यांसाठी ! प्रकाशगतीने जाणाऱ्या तुमच्या यानाच्या बाबतीत काहीतरी वेगळे घडून येईल. हे धनाणुक अगदी कागदाला टाचणीने छिद्रे पाडावीत इतक्या सहजतेने यानाला छिद्रे पाडू शकतील. मग यानाच्या पृष्ठभागाच्या प्रत्येक चौरस सेंटिमीटरमधून प्रतिसेकंदास $१०^{१०}$ कण अशा रीतीने आत घुसतील. पृथ्वीवर आपल्यावर पडणाऱ्या वैश्विक किरणोत्सर्गाच्या घनतेहून ही घनता $१०^{१०}$ पटीने अधिक आहे. थोडक्यात, तुमच्या अवकाशयात्रिकांना शक्तिशाली अशा धनाणुक गतिवर्धका [proton-accelerator] च्या कोठीत नेऊन बसवल्यासारखेच होणार आहे. तुमचे यान मग दूरच्या ताऱ्यांकडे नेणारे यान उरणार नाही. ते थेट स्वर्गाकडे नेणारे यान ठरेल. तुमचे फोटॉन यान मृत्यू-यान ठरेल–मृत्यूयान !

फोटॉन पुरस्कर्ता : मुळीच नाही ! ते धनाणुकसुद्धा चुंबकीयक्षेत्राद्वारे परावर्तित केले जातील. आणि चांगली सुयोग्य संरक्षण-कवचेही शोधून काढण्यात येतील.

संशयात्मा : (किंचित माघार घेत) छान, छान ! म्हणजे तुमच्या साऱ्या योजना अगदी पक्क्या आहेत तर, मग काय प्रश्न आहे ? हो. बरी आठवण झाली. काय हो या फोटॉन यानातून कुठे कुठे जाण्याचा बेत आहे तुमचा ? म्हणजे असे जबरदस्त यान तुम्ही काही चन्द्रावर जाण्यासाठी वापरणार नाही हे समजतंय हां आम्हाला; पण प्रश्न असा की, कोणकोणत्या ग्रहावर जाण्यासाठी तुम्ही या अग्नि-यानाचा उपयोग करणार आहात ?

फोटॉन पुरस्कर्ता : (हसू दाबीत) अहो, ग्रहांचे काय घेऊन बसला आहात ? आम्ही हे यान वापरू ते दूरच्या ताऱ्यांकडे जाण्यासाठी, त्यांच्या ग्रहमालिका धुंडाळण्यासाठी ! एवढेच कशाला सारी आकाशगंगा, दूरची उपविश्वंही पालथी घालण्यासाठी आम्ही ते यान वापरू. समजलात काय ?

संशयात्मा : समजणार काय ? हो, एवढे मात्र कळले की तुम्हाला न उमजलेली गोष्ट समजावून सांगायला हवी आहे. असे पहा. संपूर्ण आकाशगंगा पालथी घालता येईल एवढी गती मिळवायची असेल तर त्यासाठी अग्नियानाचे मूळचे एकूण वजन व त्याचे उपयुक्त वजन अर्थात पेलोड यांचे गुणोत्तर असावे लागेल $१०^{१७}$ : १ एवढे ! कबूल ? ठीक आहे. आता तुमच्या भव्य योजनेला शोभेसे आणि तरीही फक्त असे १,००,००० टन एवढ्याच वजनाचे पेलोड आहे. असे गृहीत धरूया. म्हणजे अग्नियानाचे मूळचे वजन असावयास लागेल $१०^{२२}$ टन ! आता इथे हे सांगायला हरकत नाही की आपल्या छोट्याशा पृथ्वीचे, म्हणजे तुमच्या दृष्टीने अंतरिक्षातल्या एका क्षुद्र जंतूचे, वस्तुमान आहे फक्त $६ \times १०^{२१}$ टन समजले ?

जाता जाता मारलेला हा ठोसा फोटॉन पुरस्कर्त्यांना एवढ्या सणसणीतपणे

बसतो की त्यांच्या डोळ्यांसमोर ताऱ्यांऐवजी लक्षावधी काजवेच चमकून जातात. या ठिकाणी बिचाऱ्यांना सरळ सरळ माघार घ्यावी लागते. ते पराभूत होतात खरे. पण नाउमेद? छट्, कधीच नाही! तेच कशाला. पण कोणीही याबाबतीत कधीच नाउमेद व्हायचा नाही. कितीही अडचणीसमोर उभ्या केल्या तरी मानवाची दूरच्या ताऱ्यांकडे जाण्याची स्वप्ने कधीच मावळायची नाहीत आणि फोटॉन अग्निबाण प्रत्यक्षात जरी नाही आले तरी, काय बिघडलंय? मानव पुढे काही नवी तत्त्वं शोधून काढेल. नवे मार्ग शोधून काढेल; ज्यांची कल्पनासुद्धा आज करता यायची नाही. पण एक ना एक दिवस अंतरिक्षावर शास्त्र मात करेलच करेल आणि आपले वारसदार निश्चितच निळ्या निळ्या सूर्याचे गूढ जादुई विश्व पाहू शकतील. अनुभवू शकतील. निश्चितच! निश्चितच!!

समाप्त

---

## नसती उठाठेव

पृष्ठ २० वरून

तेव्हा बाई आपण केलंत ते योग्यच केलं. आपल्या सेक्युलर धोरणांना शासनाचा निश्चित पाठिंबाच राहील. आता पुढची पावलंही झटपट उचला–

– मुलींना गणवेषात, लांबसडक केसांना सुटी द्यायला लावून "बॉब" अत्यावश्यक करून टाका.

– नमस्कार दोन्ही हात छातीपाशी जोडून करायला मनाई करून, कपाळछातीपाशी एकच हात एकेकदा नेऊन नमस्कार करायची सक्ती करून टाका.

आणि पालकांनी, निषेधाची भाषा करत असतानाही 'प्रेस्टीज' टिकवायचं असेल तर आपापल्या पाल्यांना कॉन्व्हेंट्स्‌मधनंच पाठवत चला! त्यातनंच खराखुरा सेक्युलर भारत उभा राहील!

– गो अहेड!!

□ □ □

# स्त्रियांच्या राष्ट्रीय खेळाचे सामने

चूल आणि मूल या बंधनातून स्त्री कधीच बाहेर पडली. आज अनेक क्षेत्रात ती स्वकर्तृत्वाने संचार करते आहे. क्रीडाक्षेत्रही याला अपवाद नाही. कटक येथे पंधरवड्यापूर्वीच झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत पुण्याच्या अलका दिघेने १०० मीटर पळण्याच्या शर्यतीत जुना उच्चांक मोडून नवीन स्थापन केला.

पण तरीही महिला अथवा तरुण स्त्री आणि खेळ यांचा मेळ आपल्याकडे मुळीच समाधानकारकपणे बसलेला नाही. पुण्यामुंबईसारख्या सर्वार्थाने पुढारलेल्या शहरातही ही गोष्ट जाणवते आणि महाराष्ट्रातील बहुसंख्य जिल्ह्यात तर शून्यापासूनच सुरवात करावी लागेल. टेबल टेनिस, बॅडमिंटन यासारखे खेळ हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या महिला खेळतात. आवश्यक साधनसामुग्री आणि खर्च यामुळे बहुसंख्याना ते कधीच लाभणार नाहीत., तर अनेक प्रकारचे देशी खेळ थोड्या जागेत, अत्यल्प खर्चात खेळता येण्यासारखे असून आणि भरपूर व्यायाम आणि इतर अनेक फायदे त्यापासून मिळण्यासारखे असूनही एक प्रकारची तुच्छता उपेक्षित वृत्ती आणि हे खेळच धुसमुसळे, असा न खेळताच करून घेतलेला सोईस्कर गैरसमज, या मागे महिलांच्यामध्ये असल्याचा दिसून येतो. हुतुतु, खोखो आणि इतर वैयक्तिक स्पर्धांसाठीही खेळाडू मिळवताना आणि तयार करताना दरवर्षी कशी मिनतवारी आणि पहिल्यापासून श्रीगणेशा करावा लागतो हे कोणताही कॉलेजचा क्रीडाशिक्षक सांगू शकेल.

स्त्रियांच्या राष्ट्रीय खेळाचे सामने सातत्याने तेवीस वर्षे भरविण्याचा उपक्रम करणारी अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाची मिरज ही एकमेव शाखा आहे. सामने भरविणे आणि सुव्यवस्थितपणे पार पाडणे हे बाळंतपण किती अवघड आहे हे कुठल्याही प्रकारचे सामने भरविणाऱ्यांनाच समजू जाणे. तेव्हा एवढ्या अखंडपणे आणि तेही स्त्रियांचे सामने भरविण्याबद्दल मिरज शाखेचे निश्चितच कौतुक करावयास हवे.

हे सामने यावर्षी बावीस ते चोवीस डिसेंबरला मिरजेला पार पडले. कबड्डी, फुगडी, पिंगा, शरीरसौष्ठव या चारी प्रकारांचे सामने तरुण खेळाडू आणि चाळीस

वर्षांवरच्या प्रौढ महिलांच्यासाठी स्वतंत्र असे होते. तर लांब उडी, उंच उडी, नमस्कार, दोरीच्या उड्या, निसर फुगडी, कोंबडा आणि ब्रिज सर्वांसाठी होते.

हे सामने भरविले जातात अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाच्या मान्यतेने. अर्थातच सामन्यात दरवर्षी हुतुतुचा समावेश असे. यंदा मात्र एक योग्य पाऊल टाकण्यात आले. फक्त कबड्डी सामने हे तेवढे कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने भरविले गेले. हुतुतु हा खेळ महाराष्ट्रात आता नामशेषच झाला आहे. आणि त्याचीच सुधारलेली आवृत्ती कबड्डी ही जोमदारपणे वाढली आहेच त्याचबरोबर अखिल भारतीय पातळीवर मान्यताही पावली आहे. त्याचा समावेश करणे आवश्यकच होते.

या सामन्यात आठ संघानी भाग घेतला होता. मुंबईचा (न आलेला) नवयुग मंडळाचा संघ सोडता मावळी संघ ठाणे, सेवासदन सोलापूर आणि कोल्हापूर हे तीन परगावचे संघ होते. आलेल्या संघांना भरपूर खेळण्यास मिळावे आणि प्रेक्षकांना महिला कबड्डीचे दर्शन घडावे यासाठी सर्व सामने साखळी पद्धतीने झाले. अंबाबाई तालीम संघाने सर्वांच्यावर मात केली. अगदी सहजपणे. त्या संघाला हे कौतुकास्पद असले तरी असे एकतर्फी सामने हे खेळाचा दर्जा आणि संघाचा कस वाढण्याच्या दृष्टीने फारसे उपयोगी ठरत नाहीत. मुंबईकर स्पर्धेत उतरले असते तर मात्र त्यांना चांगला प्रतिस्पर्धी भेटला असता. लेले भगिनी या विद्यापीठ संघातील खेळाडू आणि चिवटे, गाडगीळ या राष्ट्रीय सामन्यातील महिला अंबाबाई तालमीकडून चढाई आणि पकडीमध्ये विशेषत्वाने चमकल्या. सेवासदन आणि ठाणेकर यांचे कोल्हापूरबरोबर झालेले सामने रंगले. कोल्हापूरच्या साधना जोशीचा खेळ नजरेत भरण्यासारखा होता.

खोखो, लंगडी, थ्रोबॉल टप्प्याची शर्यत अशा अनेक क्रीडा प्रकारांना यावर्षी एकदम गाळण्यात आले. कबड्डीचे अखिल भारतीय पातळीवरील सामने भरविताना खेळाडूंना येण्याजाण्याचा आणि जेवणाचा द्यावा लागणारा खर्च यामुळे हा निर्णय नाइलाजाने घ्यावा लागला असे सामना समितीचे म्हणणे. त्यांची अडचण समजूनही मी ही फार जबरदस्त किंमत त्यांनी दिली असे मानतो.

या स्वरूपाच्या सामन्याचा उद्देश हा प्रथमतः महिलांना त्यांच्या उत्साहाला वाव देणे आणि देशी खेळाबद्दलचे आकर्षण वाढविणे हा आहे. कबड्डीच्या काही संघासाठी वरील चार आणि इतरही काही वैयक्तिक क्रीडाप्रकार एकदम वगळणे हे अनेक खेळाडूंची निराशा करण्यासारखे नाही का? खेळाचा कस हा मुद्दा प्रमुख मानला तरीही मग खोखोच्या खेळास अग्रक्रम द्यावयास हवा. कारण अ. भा. पातळीवर कबड्डीमध्ये गेले सतत चौदा वर्षे महाराष्ट्र महिला सतत विजयी होत आहेत. (आणि आणखी काही वर्षे तरी त्याला आव्हान मिळणार नाही हे निश्चित) या उलट महिला खोखोमध्ये मात्र मध्यप्रदेशाची मक्तेदारीला यशस्वी

आव्हान अजून कोणी दिलेले नाही. त्यासाठी तयारीचा प्राथमिक पाया अशा सामन्यातूनच घातला जात नाही का?

उंच उडी आणि लांब उडी या दोन्ही प्रकारात कोल्हापूरची साधना जोशी पहिली आली. तिचे उच्चांक आहेत ५' २" आणि १२' ११". पहिल्या नंबरच्या बाबतीत काही किमान गुणवत्तेचा आग्रह वरच्या पातळीवर नेहमीच धरला जातो. तो इष्टही आहे. मात्र अशा स्वरूपाच्या सामन्यात तो धरला तर भलतीच पंचाईत होऊन बसेल.

नमस्काराच्या स्पर्धा आज महाराष्ट्रात फारच थोड्या ठिकाणी होतात. स्त्रियांच्यासाठी या स्पर्धा घेण्यात येतात आणि महिलांचा प्रतिसादही चांगला असतो हा अनुभव उत्सावर्धक आहे. शास्त्रशुद्धपणे सर्वांगाला व्यायाम घडविणारा हा व्यायाम प्रकार. औंधकर पद्धतीने ह्या स्पर्धा घेण्यात आल्या आणि तीन मिनिटात एकवीस नमस्कार काढून सफाई व संख्या या दोन्ही गुणवत्तेवर रेखा करमरकर पहिल्या आल्या.

इतर स्पर्धा प्रकार खास बायकी होते. (खरे म्हटले तर हा शिक्का मारणे फारसे योग्य नाही. कारण या प्रकारातून पुरुषांनाही खूप व्यायाम होऊ शकेल, पण लक्षात कोण घेतो?) तीनशे पन्नास दोरीच्या उड्या तीन मिनिटात मारून कोल्हापूरची हेमलता कुलकर्णी पहिली आली.

फुगडीमध्ये सातपासून पंचवीस वर्षापर्यंतच्या मुलींनी भाग घेतला होता. जोडीतील संघनायक एक चक्र फिरून आपल्या जागेवर आला की एक याप्रमाणे तीन मिनिटाची संख्या मोजण्यात येई. मधे थांबण्यास परवानगी असे. रजनी देशपांडे आणि वर्षा करमकर या मैत्रिणींनी १०७ फेरे पूर्ण करून पहिला नंबर पटकावला.

बैठक घेऊन कमरेतून एक पाय संपूर्ण घसरून ताठ करावा व नंतर तो जवळ आणून दुसरा ताठ करावा याचे नाव निसर फुगडी. जागा सोडू शकता. हाताची हालचाल कशीही चालू शकते. शास्त्रीय भाषेत मांड्याच्या स्नायूंना हा अगदी अस्सल व्यायाम आहे. वर्षा करमकरने तीन मिनिटात एकशे चौऱ्याण्णवची संख्या गाठली. मध्ये एक सेंकदही न थांबता (खाली पायाची सालडी सोलली गेली पण बक्षीस मिळाले ना.)

कोठे ना कोठे पिंगा घालण्याची सवय आजच्या तरुणात (आणि तरुणीतही) काही नवीन नाही. पण पायाची हालचाल न करता कमरेत वाकून गोलाकारपणे शरीर वेगाने फिरवणे हा पिंगा तेवढा सोपा नाही. आणि तीन मिनिटात सुमन सावंतने मारल्या तशा १९१ फेऱ्या मारणे तर चांगलेच अवघड आहे.

कोंबडा म्हणजे गुडघ्यावर गुडघा ठेवून आणि त्यावर हात ठेवून ते न सोडता आणि न पडता पंचाहत्तर मीटरची दौड मारणे. कोल्हापूरच्या सुमन जगदाळेंनी ह्यात पहिला क्रमांक मिळवला.

स्त्रियांचे उत्तम शरीर सौष्ठव आणि सुदृढ बालक या दोन्ही गोष्टीबाबत अनेक बाजूंनी महिलामंडळाना खूप काही करता येण्यासारखे आहे. पण आपल्या अति-विशाल कार्यक्रमात बहुतेक मंडळाना यासाठी फार थोडा वेळ मिळतो. याची जाणीव ठेऊन दरवर्षी आपल्या कार्यक्रमात संस्था या दोन गोष्टींचा समावेश करते. १ वर्षांच्या आतील बाल स्पर्धेत अतुल पाटकरने तर एकावर्षावरील स्पर्धेत मनीष देशपांडेने नंबर मिळवला. शरीरसौष्ठव स्पर्धेत पुण्याच्या सौ. गायत्री भिडे पहिल्या आल्या.

सर्व स्पर्धा संपल्यावर बक्षीस समारंभापूर्वी झालेल्या लोकनृत्यांनी कार्यक्रमावर कळस चढवला हे मान्य करावयास हवे. मिरजेच्या शारीरिक शिक्षण मंडळाने सादर केलेल्या केवढा मोठा फटाका या गंमतशीर गीतनृत्याने खूपच रंगत आणली. न्यू इंग्लिश स्कूल कन्याशाळेच्या 'मुलींना डोलकर दरीयाचा राजा' हे स्वतःच

---

## सोईचे अखिल भारतीयत्व

महाराष्ट्राच्या चार जिल्ह्याबाहेरचा एकही संघ नसलेला, हे सामने अखिल भारतीय पातळीवरचे होते. अलीकडे अनेक सामने हे याच पद्धतीने अ. भा. पातळीवरचे म्हणून भरविले जातात. अखिल भारतीय या विशेषणाची ही थट्टा नव्हे का ?

संयोजकांना हे समजत नसते असे नव्हे. पण त्यांचा नाईलाज असतो. कारण खेळाडूंना येण्यासाठी आवश्यक असलेले रेल्वे कन्सेशन फक्त अखिल भारतीय पातळीच्या सामन्यांनाच मिळू शकते. ही रेल्वे सवलतीमुळे वाचणारी रक्कम बरीच असते. अखिल भारतीयत्वाची बिरुदावली लावून इतर कोणताच तोटा होत नाही (झाला तर फायदाच. झालेल्या खेळाडूंना अखिल भारतीय अजिंक्यपद मिळवल्याच्या कल्पनेने होणारा.)

माझ्या मते मात्र हा प्रकार ताबडतोब बंद व्हावयास हवा. अखिल भारतीय विशेषण लावावयाचे तर भारतातल्या किमान चार राज्यातले संघ तरी यावयास हवेत, जसे भोईर सुवर्ण चषकाच्या कबड्डी स्पर्धेत येतात. महाराष्ट्रात आता खेळाचा स्वतंत्र विभाग झाला आहे. रेल्वे सवलतीची अडचण महाराष्ट्र पातळीवर सोडविण्यास त्यामुळे काही अडचण येऊ नये ही अपेक्षा रास्त नाही काय !

क्रीडा विभागाची पुनर्रचना झाल्यावर होणारा पहिला महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव सांगली येथे ७ ते १० जानेवारीला मोठ्या थाटामाटाने पार पडेल. एक खेळाडू म्हणून आणि समीक्षक म्हणूनही त्याचे खरेखुरे रुपरंग पुढील दोन क्रीडांगणात वाचकांना सादर केले जाईल.

---

दर्याचे राजे असल्याच्या थाटात सादर केले. कल्पना खरात या छोटया मुलीचा खास उल्लेख करावयास हवा. शास्त्रशुद्ध शिक्षण मिळाले तर ही मुलगी या क्षेत्रात नाव चांगलेच वर काढेल. महिला विकास कन्याशाळेचे पाटलाचे लग्न हे नृत्यही छान झाले.

सुमारे पाच हजार रुपये खर्चून पार पाडलेल्या या क्रीडामहोत्सवात पैशाची अडचण असतेच. पण वैद्य करमकरांच्यासारखे जिद्दीचे अध्यक्ष दरवर्षी असंख्य अडचणीतून ही रक्कम जमवितात. पण त्यांचे खरे दुःख हे नाही. जे दुःख आहे ते आहे सच्चा क्रीडाप्रेमी कार्यकर्त्यांचे मनोगत. त्यांना वाटते एवढा सारा खटाटोप करूनही शाळांचा मिळणारा प्रतिसाद नेहमीच खेदजनक असतो. शाळेच्या शारीरिक शिक्षणाच्या चाकोरीबाहेरचे पण आवश्यक असे हे कार्य शाळा आपले मानतच नाहीत. बऱ्याच शाळा दखल घेत नाहीत. ज्या थोडया घेतात त्या अत्यंत अपुऱ्या तयारीने. खेळाचा दर्जा मग सुधारणार कसा. आमच्या या कार्याशी क्रीडासंस्था, शाळा आणि महिला मंडळे यांनी आपुलकीचे नाते जोडले तर खूपच प्रगती करता येईल. तयारीसाठी मिळालेला अपुरा वेळ आणि कबड्डी सामन्यांच्या खर्चामुळे गाळावे लागलेले इतर अनेक क्रीडाप्रकार याची खंत त्यानाही आहे. पुढच्या वर्षी शानदार कबड्डी सामन्याबरोबरच पूर्वीचे सर्व खेळ परत घेण्याची त्यांची जिद्द आहे.

या साऱ्या स्पर्धांची फलश्रुती काय ? क्रीडांगणावरचे उत्साहाने उचंबळणारे वातावरण ज्यांनी बघितले असेल ते हा प्रश्न विचारणारच नाहीत. मिरजेसारख्या छोटया गावात दीड-दोनशे खेळाडू आणि त्यांचा खेळ बघण्यासाठी कौतुकाने रात्रीपर्यंत बसून रहाणाऱ्या सातपासून ते सत्तरीपर्यंतच्या सातशे-आठशे महिला ही कमाई निश्चितच थोडी नव्हे. थोडे खेळाडू या स्पर्धेमधून स्फूर्ती घेऊन खेळाचा सराव सतत ठेवतील आणि प्रेक्षकामधल्या काही कार्यकर्त्या महिला तरी या निकोप प्रकृतीची जोपासना जाणीवपूर्वक घेण्यासाठी कार्याला लागतील हे एवढे जरी झाले तरी भारतीय खेळ आणि खेळाडू यांना खूप काही मिळेल. हे होऊ शकेल हा दिलासा या स्पर्धांनी दिला खरा.

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

९ ते १५ जानेवारी १९७१

# अंदाज

**मेष** : शरीरप्रकृती साधारण नरमच राहील. थोडासा स्वभावात कठोरपणा येईल. राग आवरावा. धनस्थिती चांगलीच सुधारेल. मंगळवार-बुधवारी घरासंबंधी प्रश्न मनासारखे सुटतील. भावंडाकडून व मुलांकडूनच या कार्यात अमोल मदत होईल. उद्योगव्यवसायात सर्व बाजूंनी प्रगती होईल. बिल्डिंगचे काम करणारांना खूपच चांगले दिवस आहेत. मित्रांकडून फसवणूक होण्याचा बराच संभव आहे. हा योग गुरूवार-शुक्रवारी जास्त आहे.

विद्याभ्यासात थोडासा आडथळा येईल. तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारांना दिवस चांगले जातील. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी नोकरीच्या प्रयत्नात असलेल्यांना नोकरी मिळेल. सरकारी कामात यश मिळेल. प्रवासयोग रविवारी येईल. त्यात त्रास होईल. शक्य तर प्रवास टाळावा.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. शुभ तारखा-सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**वृषभ** : शरीरप्रकृती चांगलीच सुधारेल. स्थावराबद्दलची सरकारी कामे सोमवारी उरकून घ्यावी. कुटुंबातील व्यक्तींचे सहकार्य मिळेल. मंगळवार-बुधवारी घरात काहीतरी शुभ समारंभ घडून येईल. गुरू-शुक्र-मंगळ युती विवाह योग घडवून आणील. मुलांकडून मागणी येईल. प्रेमप्रकरणात सापडलेल्यांचे विवाह योग येतील. ता. १५ शुक्रवार या करता फारच चांगला आहे.

विद्याभ्यासात अपयश येईल. बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींना दिवस फारच अडचणी निर्माण करणारे आहेत. सरकारकडील कामे पुढे ढकलावी. रवी मकरेत १४।१ ला जातो आहे. त्यानंतर त्यांना चालना द्यावी. पत्नीचे सहकार्य पूर्ण मिळेल. काही नवीन वस्त्रांची व दागिन्यांची खरेदी मंगळवार-बुधवारी होईल. सरकारी नोकरवर्गांना कामात भरमसाट ताण पडेल.

चंद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. सर्व आठवडा शुभफलदायी आहे.

**मिथुन** : प्रकृती चांगली राहील. धनस्थितीत पुष्कळच सुधारणा झालेली असेल. मंगळवार-बुधवार अचानक धनलाभ होईल. एकाद्या सार्वजनिक कामात भाग घ्यावा लागेल. त्यात मानसन्मान होईल. घरात शुक्रवारी सर्व कुटुंबातील मंडळी

एकत्र येऊन काहीतरी धार्मिक कार्य घडण्याचा दाट संभव आहे. उद्योगव्यवसाय प्रगतीपथावर जाईल.

विद्याभ्यासात यश मिळेल. मेडिकल, मेकॅनिकल वगैरे विषयांचा अभ्यास करणारांना थोड्याशा अडचणी निर्माण होण्याचा संभव आहे. भागीदार चांगले वागतील. प्रेमविवाह होण्याचा दाट संभव आहे. मातुल घराण्याकडून आणि भावंडांकडून विवाह जमवण्याला मदत होईल. शत्रूंचा नाश होईल. कदाचित शत्रूंकडून व्यवसायात चांगली मदत होण्याचा शुभ योग आहे.

चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून असून ते फारच चांगले आहे. मंगळवार–बुधवारी अचानक मौल्यवान वस्तूची खरेदी होईल. अचानक धनलाभ होईल. शुभ तारखा ९ ते १४.

**कर्क :** पहिले दोन दिवस प्रकृती जराशी नरमच राहील. थंडीचा विकार होण्याचा संभव आहे. पैशाची जरा ओढाताणच होईल. भावंडांशी मतभेद होतील. पराक्रमाला गालबोट लागेल. धंदाव्यवसाय चांगला चालेल. प्रिंटर्स, मशीनवरचे व्यापारी यांना दिवस प्रगतीपर आहेत. मंगळवार-बुधवारी स्वतःच्या हिंमतीवर एकादे असाधारण काम हातून घडेल. अचानक धनलाभ होईल.

विद्याभ्यासात भरघोस प्रगती होईल. संततीचा उत्कर्ष करणाऱ्या घटना सहज घडतील. २७ ते ३२ मधील व्यक्तींना हातात धरतील त्यात यशःप्राप्ती होईल. घरातील वृद्ध व्यक्तींना विशेषतः माता–पित्यांना मोठा आजार येण्याचा योग आहे. आधीपासून काळजी घ्यावी. मित्रांकडून सर्व प्रकारची मदत होईल. पंचमातील गुरू-शुक्र-मंगळाशी ता. १२ ला होणारा चंद्राचा त्रिकोण सर्व बाजूंनी प्रगती घडवून आणील.

चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे. ते तितकेसे चांगले नाही. शुभ तारखा ११।१२।१३. ता. १५ ला पैशाची अडचण येईल.

**सिंह :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थानाची अवस्था चांगली राहील. सरकारकडून येणारी रक्कम मंगळवार-बुधवारी हातात पडेल. घरात विवाहासारखा शुभसमारंभ होईल. घरातील व नातलग मंडळी जमून दिवस आनंदात जाईल. प्रवासयोग येईल. भावंडांकडून वाईट वागणूक होईल. जागेचे व घराचेसंबंधी सर्व कामे मनासारखी होतील.

विद्याभ्यासात यश मिळेल. सरकारी मदत मिळेल. संततीचा भाग्योदय होईल. सरकारी नोकरीचा प्रयत्न सफल होईल. हा योग गुरूवार-शुक्रवारी येईल. फॅन्सी वस्तूंचा व्यापार चांगला चालेल. अचानक धनलाभाचा योग मंगळवार-बुधवारी येईल. सरकारी कामात यशःप्राप्ती होईल.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. शुभ तारखा १०।११।१४।१५.

**कन्या :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थिती आपोआप चांगलीच होईल. भावंडांकडून कामात सर्व प्रकारे मदत होईल. भागीदारांकडून सर्व प्रकारे सहाय्य मिळेल. सरकारी कामात सर्व प्रकारे यशस्विता प्राप्त होईल. एखाद्या सम्मेलनात भाग घ्यावा लागेल. कदाचित ललित कलेत हा योग येईल. भाग्योदय होईल. वयाचे २७ ते ३२ मध्ये असलेल्या व्यक्तींची अचानक प्रगती होईल. प्रेमाच्या लफड्यात सापडण्याचा योग आहे.

विद्याभ्यासाते थोडासा अडथळा येण्याचा संभव आहे. संततीशी मतभेद होतील. विद्येत अपयश येईल. शत्रूनाश होईल. व्यापारात खूपच प्रगती होईल. सरकारी प्रकाशनाच्या व्यवसायात असलेल्यांना प्रगतीपर दिवस आहेत.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२ स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. शुभ तारखा ९।१०।११।१२।१३. गुरूवारी तात्त्विक चर्चेत भाग घेण्याचा योग येईल.

**तूळ :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. धनस्थानाची स्थिती फारच सुधारेल. पत्नीकडून सर्वप्रकारची मदत होईल. प्रवासयोग येईल, त्यात फायदाच होईल. मिलिटरीत नोकरी करणारांची अचानक प्रगती होईल. मंगळवार-बुधवारी घरात माता आजारी पडण्याचा संभव आहे. २४ ते २८ वयातील व्यक्तींना मिलिटरीत प्रमोशनचा योग येईल.

विद्याभ्यासात अपयश येईल. शास्त्रीय विषयांचा अभ्यास करणारांना बराच त्रास होईल. मातुल घराण्याकडून आर्थिक मदत होईल. प्रेमप्रकरणातून शुभ विवाह ठरण्याचा योग निश्चित आहे. वाहतुकीचा व्यवसाय करणारांना खूपच फायदा होईल. सरकारी नोकरांना प्रमोशनचा योग आहे. मंगळवार-बुधवार सार्वजनिक कार्यकर्त्यांचा मानसन्मान होईल.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. शुभ तारखा ९।१०।११।१२.

**वृश्चिक :** शरीरप्रकृती चांगली राहील. शनिवार-रविवारी जरासा थंडीचा त्रास होईल. धनस्थितीत चांगलीच सुधारणा होईल. सरकारकडून येणे असलेल्या रकमा पदरात पडतील. भावंडे नीट वागणार नाहीत. गृहस्वास्थ्य बिघडण्याचा बराच संभव आहे. उद्योगधंदा चांगला चालेल. सरकारी नोकरांना कामाचा ताण जास्तच पडेल.

विद्येत प्रगती चांगलीच होईल. संततीची सर्व बाजूंनी प्रगती होईल. भागीदारांची सर्व बाजूंनी मदत होईल. घरात आनंदी वातावरण राहील. मातुल घराण्यातील पाहुणे येतील. उद्योगधंदा मनासारखा वाढेल. सरकारी प्रकाशनाचे काम करणारांना चांगलाच फायदा होण्याचा योग आहे. मंगळवार-बुधवारी अचानक धनलाभ होईल.

चंद्राचे भ्रमण ८।९।१० या स्थानातून होत आहे. ते साधारण आहे. शनिवार,

रविवार सोडून सर्व सप्ताह शुभ फल देणारा आहे.

**धन** : शरीरप्रकृती जरा नरमच राहील. अपचनाचा विकार वाढेल. धनःस्थिती अनिश्चित राहील. भावंडांशी तीव्र मतभेद होतील. गृहस्वास्थ्यहानी होईल. सुखाला कमीपणा येईल. त्यातले त्यात गोचरी गुरु सुखस्थानाशी ९।५ योग करतो. तो चांगले फल देईल. नोकरीत बढती मिळेल. सरकारी नोकरांना प्रमोशन मिळेल. विवाहाचा योग जमून येईल.

विद्याभ्यासात निष्कारण अडचणी निर्माण होतील. मित्रांकडून मदत होणार नाही. उद्योगधंदा चांगलाच चालेल. बौद्धिक व्यवसायात प्रगती होण्याचा योग मंगळवार-बुधवारी आहे. धार्मिक कामाकरता प्रवासयोग येईल. भागीदार समजूतदारपणाने वागतील. पत्नीच्या सहकार्याने व्यवसायात चांगलीच प्रगती होईल. " पुरुष धनुर्धर संसाररथा सारथिसम भार्या " हे सिद्ध होईल.

चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून होत आहे. ते फारच चांगले आहे. रवी-चंद्राना ६।८।१२ या स्थानांचा दोष नसतो. शुभ तारखा ९।१०।११।१२.

**मकर** : शरीरस्वास्थ्य चांगले राहील. धनस्थिती जराशी नरम असेल. येणारे पैसे हातात पडण्याला अडचणी येतील. घरातील तंटे मंगळवारनंतर कमी होतील. घरासंबंधीचे गुंतागुंतीचे प्रश्न अत्यंत चांगल्या रीतीने सुटतील. भावंडांची सर्व प्रकारे सहायता मिळेल. मंगळवार, बुधवार घरातच पण अत्यंत आनंदात जातील. सरकारी कामे लांबणीवर टाकावी.

विद्याभ्यासात चांगली प्रगती होईल. साहित्यिक, प्रकाशक, कलाकार यांना पुढे येण्याला मदत करणारे ग्रहयोग आहेत. व्यवसाय चांगला चालेल. मंगळवार–बुधवारी चंद्राचा गुरु-शुक्र-मंगळाशी ९।५ योग होतो आहे. तो फार चांगला आहे. पराक्रम, पैसा, प्रेम, मानसन्मान सर्वच बाबतीत डोळयात भरण्याजोगी प्रगती होईल.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून होत आहे, ते अत्यंत चांगले आहे. चंद्र-रवींना ६।८।१२ स्थानांचा दोष नसतो. शुभ तारखा ९।१०।११।१२।१३.

**कुंभ** : शरीरप्रकृती चांगली राहील. थोडासा हट्टवादीपणा वाढेल. राग अनावर होईल. तो आवरावा. धनस्थितीत अचानक सुधारणा होईल. गुरु-शुक्र-मंगळांचा दशमस्थानातील योग फारच चांगला आहे. त्यातल्यात्यात मंगळवार, बुधवार चंद्राचा ९।५ योग होतो आहे. अचानक मानमरातब व धनलाभ होण्याचा योग आहे. गुरुकृपा होईल. अध्यात्माची गोडी वाढेल.

विद्याभ्यासात प्रगती होईल. सरकारी अभ्यासक्रमात निवडून येण्याचा योग आहे. वडील भावंडाकडून या बाबतीत चांगलीच मदत होईल. बौद्धिक व्यवसाय

पृष्ठ ५६ वर

एका म्हाताऱ्याचा खून
आणि
प्लॅटफॉर्म

रंगायनच्या या दोन एकांकिका.
यांचे पहिलेवहिले प्रयोग होऊन
बरेच दिवस झाले.
पण प्रायोगिक मराठी रंगभूमीवरील
हे पुढचे पाऊल म्हणून थोड्या उशीराने
का होईना त्यांची दखल...

# एका म्हाताऱ्याचा खून

# प्लॅटफॉर्म

त्यांना मैलोन्-मैल निर्दयपणे फरफटवीत नेणाऱ्या त्या पाषाणहृदयी म्हाताऱ्यापासून एकदाची मुक्तता करून घेण्यासाठी, ते दोन पुरुष व एक स्त्री, अखेर त्याचा निर्घृणपणे खून करतात. पण सुटका झाल्यावरसुद्धा ते पळून जाऊ शकत नाहीत. एकाएकी इतका वेळ भाजणारे प्रखर ऊन लोपून निबिड दिशाशून्य अंधार पसरतो. लांडगेकुई ऐकू येऊ लागते, ती जवळ-जवळ येऊ लागते आणि 'लांडगे मृतदेह खात नाहीत, त्यांना जिवंत माणसेच भक्ष्यासाठी लागतात' ही भयावह जाणीव उराशी बाळगीत, ते तिघेजण हताशपणे त्या म्हाताऱ्याच्या मृतदेहाजवळ बसून राहतात—हळूहळू जवळ येणाऱ्या मृत्यूची प्रतीक्षा करीत !

'एका म्हाताऱ्याचा खून (ले. प्रा. महेश एलकुंचवार) मधील हा अखेरचा परिणामकारक प्रसंग ! या एकांकिकेला सुरुवात होते, एका बलदंड, पिकल्या दाढीच्या म्हाताऱ्याने या तिघांची मनगटे लांब दोरखंडांनी गच्च बांधून त्यांना ताबडवीत आणण्याने ! त्यातील स्त्रीने भ्रूणहत्या केली आहे, एकाने पैशाची अफरातफर केली आहे आणि एकाने सावत्र आईवर सूड उगवला आहे. या तिघांना तो म्हातारा कोठल्यातरी दूरच्या तुरुंगात घेऊन चालला आहे. हे थकलेले तिघेजण, मधून-मधून चालणे अशक्य होते तेव्हा थांबतात. त्यावेळी आत्मनिवेदन करतात. अखेर सुटका करून घेण्यासाठी त्या म्हाताऱ्याचा ते खून करतात. पण सुरुवातीला म्हटले आहे त्याप्रमाणे ते कधीच मुक्त होऊ शकत नाहीत.

प्रा. महेश एलकुंचवार या नवोदित एकांकिका लेखकाच्या आशयगर्भ नाट्य

सामर्थ्याचा प्रत्यय ' रंगायन 'नेच काही महिन्यांपूर्वी रंगभूमीवर आणलेल्या ' होळी ' व ' सुलतान ' या एकांकिकातून आला होता. त्यांची ' एका म्हाताऱ्याचा खून ' ही-सुद्धा एक यशस्वी प्रतिकात्म एकांकिका आहे.

माणसाचे दैनंदिन जीवन म्हणजे एक तुरुंगच असतो; एक कधीही न संपणारी कंटाळवाणी तंगडतोड असते. त्या कालपुरुषापासून पळायचा कितीही प्रयत्न केला तरी त्यात यश येत नाही, हळूहळू येणारे जिवंत मरण माणूस अगतिकतेने जगत राहतो. मग त्या अगतिकतेत दिलासा म्हणून, मनुष्य कोवळे मृदुबंध निर्माण करण्याची धडपड करीत राहतो. त्यामुळेच स्वतःला समजून घेणारे कोणीच नाही हे उमजत असतानाही त्या स्त्रीला दुसऱ्या पुरुषाच्या काळ्याभोर केसांचे आकर्षण वाटते; पहिल्या पुरुषाची सावली हवीशी वाटते ! मानवी जीवनाची ही विदारक कुतरओढ प्रा. एलकुंचवारांच्या या एकांकिकेतून आपल्याला सूक्ष्मतेतून प्रतीत होत राहते.

ही समर्थ एकांकिका ' रंगायन 'चे नव्या उमेदीचे तरुण दिग्दर्शक राजा बापट यांनी तितक्याच आव्हानाने रंगभूमीवर आणली आहे. प्रेक्षागृहात प्रवेश केल्यावर समोरचा दर्शनी पडदा, प्रेक्षक-निकटत्वासाठी नष्ट केलेला आढळतो. काळोख्या रंगमंचावर रेताड वैराणपणाचा आभास देण्यासाठी रंगमंचाच्या बाहेरच्या बाजूला एक व आतल्या टोकाला एक असे मांडलेले दोन भकास निवडुंग दिसतात आणि रंगमंचाच्या मध्यावर उंचावर चढल्याचा भास व्हावा म्हणून दोन-तीन पिवळट प्लॅटफॉर्मस् एकावर एक असे रचलेले दिसतात. एकांकिकेस सुरुवात होते तेव्हा, डोळे दिपवून टाकणाऱ्या भगभगीत पिवळ्या उन्हाचा आभास निर्माण करणाऱ्या प्रकाशात त्या तिघांना फरफटवीत म्हातारा प्रवेश करतो. नाटकाच्या अंती, म्हाताऱ्याचा खून झाल्याबरोबर हा प्रकाश लोपतो आणि दिशांचे भाग हरवून टाकणारा काळोख चहुकडून दाटत येतो. प्रकाशाचा एक झोत त्या अगतिक तिघांवर काही वेळ राहतो आणि अखेर सारेच अंधारमय होते– ही वातावरणानुरुप प्रकाशयोजनेची किमया– श्री. राम शितूतांची !

राजा बापटांच्या कल्पक दिग्दर्शनाची चुणूक या नाट्यदर्शनात ठिकठिकाणी दिसते. ही तीन पात्रे थोडा वेळ निवेदन केल्यानंतर, मधून-मधून चालत राहतात हे दर्शविण्यासाठी बापटांनी त्यांना जागच्याजागीच तालबद्धपणे पाय मागे-पुढे हलवायला लावले आहेत. तसेच पात्रांच्या हालचालींमध्ये, त्यांनी विवक्षित ठिकाणी उभे राहण्यातही सूत्रबद्धता दिसते. उदा. मध्यभागी उंच प्लॉटफॉर्मवर उभ्या असलेल्या म्हाताऱ्याच्या पायाशी स्त्री कोसळलेली, तिच्या दोन्ही बाजूला ते दोन्ही पुरुष व या तिघांचे हात बांधणारे लांबलचक दोरखंड त्या म्हाताऱ्याच्या हाती–अशी पात्ररचना जेव्हा रंगमंचावर होते तेव्हा त्यामध्ये एक कलात्मक आकृतिबंध जाणीवपूर्वक साधल्याचे उमजते ! तसेच त्या तिन्ही कैद्यांना नखशिखांत

काळे कपडे व म्हाताऱ्याला पिवळट गोणपाटाचे अंगभर कपडे त्यांनी सूचकतेने वापरायला लावले आहेत.

'स्त्री'ची भूमिका करणारी अनुया पालेकर व पहिल्या पुरुषाची भूमिका करणारे प्रभाकर पाटणकर हे दोघेही गुणी कलावंत आहेतच. पण दुसऱ्या पुरुषाची भूमिका करणाऱ्या दिलीप कुलकर्णीनेही आपली भूमिका ठीक वठवली. अरविंद भिंगाऱ्यांनी अबोल म्हाताऱ्याचा बलदंड कणखरपणा व्यवस्थित दाखविला.

लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य या साऱ्याच दृष्टीने त्यामुळे 'एका म्हाताऱ्याचा खून'चा नाट्यप्रयोग चांगला वाटला.

त्यानंतर 'रंगायन'मधील वृंदावन दंडवते यांची पहिलीच 'प्लॅटफॉर्म' ही एकांकिका सादर करण्यात आली. रंगपीठावरील सामूहिक हालचालींविषयी त्यांच्या काही दृढ कल्पना आहेत आणि 'प्लॅटफॉर्म'मध्ये त्यांचा आविष्कार करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या समूहचलनाचे (choreography) दिग्दर्शन त्यांनी केले आहे तर, मूक भावाविष्काराचे (mime) शिक्षण इर्शाद पंजतन यांनी दिले. नाट्यशिबिराच्या विद्यार्थ्यांना या एकांकिकेच्या तालमीतून सामुहिक हालचाली, त्यातील शिस्त-लय यांचे शिक्षण मिळाले, अशी या एकांकिकेची पार्श्वभूमी 'रंगायन'ने स्मरणिकेत दिली आहे.

## प्लॅटफॉर्म

वृंदावन दंडवत्यांनी लिहिलेले 'प्लॅटफॉर्म' हे एक मूकनाट्य आहे आणि प्रायोगिक मराठी रंगभूमीवरील हा पहिलाच प्रयोग आहे. या एकांकिकेत संवाद नाहीत. पण आगगाडीच्या येण्याजाण्याची घोषणा व पार्श्वभूमीवर असणारे दाराचा आभास देणारे दोन करडे सेटस् एवढेच 'साईड इफक्टस्' वापरून खऱ्या प्लॅटफॉर्मवर घडणाऱ्या गडबडीचा प्रत्यय देण्याचा एक बऱ्याच अंशी जमलेला, असा हा प्रयत्न आहे.

प्रत्यक्ष प्लॅटफॉर्मवर नेहमी अनेकांची गर्दी असते. आगगाडीच्या वेळेवर माणसे इकडून येत असतात, तिकडून बाहेर पडत असतात, गाडीमध्ये वर आधाराला धरून हिंदकळत प्रवास करत असतात, प्लॅटफॉर्मवर कोणी बूटपॉलिशवाला असतो तर कोणी ठराविक गाडीला येणाऱ्या, एका फाकड पोरीची वाट बघत थांबणारा हीरो असतो, एखादा भिकारी असतो. हे सारे केवळ मुखवटे असतात, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नसते, ते केवळ गर्दीचा एक भाग असतात आणि त्यांच्या

बोलण्याचा एकत्रित श्रवण-परिणाम चक्क कोंबड्यांच्या कलकलाटासारखा येत असतो–हे सारे शब्दावाचून केवळ 'बोल्ड ॲक्टिंग 'मधून पकडण्याचा येथे दंडवतेंचा प्रयत्न आहे.

त्याकरिता त्यांनी वापरलेले 'डिव्हायसेस्' मजेशीर आहेत. एक म्हणजे त्यांनी सूत्रधार आणला आहे. रंगमंच प्रकाशमान होतो तेव्हा संपूर्ण तोंड मुखवट्याप्रमाणे रंगविलेला सूत्रधार प्रेक्षकांकडे एकदा चोरून बघतो, नंतर धीटपणे पुढे येऊन दोन्ही हात बाजूला फैलावून व कमरेतून झुकून 'मी तुमच्यपुढे आता काहीतरी सादर करणार आहे', असे सूचित करतो. त्यानंतर पुन्हा आत जाऊन तो एका हातात ड्रम घेतलेल्या शेमलेवाल्याला ओढून आणतो व त्याला रंगमंचाच्या एका कोपऱ्यावर बसवतो. त्यानंतर तो दोन्ही विंगात जाऊन आत खूपशा जणांना ओढून आणतो. ही सारी पात्रे केवळ पांढरी बनियन व पँटस् (दोन मुली पांढऱ्या पंजावी वेषात !) मध्ये आहेत आणि सगळ्यांच्या चेहऱ्यांवर मुखवट्याप्रमाणे सारखा 'मेकअप' केला आहे. हा मेकअप विदूषकी थाटाचा, कपाळात उंच भुवया व फाकलेले लालभडक ओठ असा आहे.

त्यानंतर सूत्रधार त्या शेमलेवाल्याला ड्रम वाजवायला सांगतो. आगगाडीच्या धडधडाटाचा प्रत्यय देणाऱ्या ड्रमच्या तालावर मग एकांकिकेतील 'ॲक्शन' सुरू होते. आगगाडीची 'अनाऊन्समेंट' झाल्याबरोबर चपापून थांबून घड्याळाकडे पहात लोक आपापल्या गाडीकडे धावतात, परस्परांच्या दंडांना धरून हात वर लोंबकळत ठेवून, थिरकत चालत जाऊन आगगाडीचा आभास निर्माण करतात. यामध्ये तेथे एक हीरो येतो, त्यालाच फक्त व्यक्तिवैशिष्टच मिळावे म्हणून काळा, तंग पोषाख दिला आहे. ठराविक गाडीला येणाऱ्या एका मुलीची नेत्रप्रतीक्षा करीत तो बापडा, सारखा घड्याळावर नजर टाकीत, तेथे उभा आहे. पण तेवढ्यात त्याच्याकडे चार-पाचजण सिगरेट पेटविण्यासाठी काड्याची पेटी खणाखुणा करूनच मागतात व तो बापडा देत राहतो. डोक्यावर तांबडी टोपी मात्र ठेवून एक गावकर त्याला गाडीविषयी पृच्छा करतो, एक तिकिटचेकर येतो व याच्याजवळ तिकिट आहे, हे बघून हिंपुटी होतो. अखेर त्याची 'ती' येते. तर नेमका तिचा मुद्दाम पाडलेला रुमाल तो उचलणार तेवढ्यात एक भिकारी त्याच्यापुढे गयावया करायला लागतो आणि तीही हिरमुसली होऊन तिच्या गाडीला निघून जाते. बिच्चारा निराश हीरो त्याच्या गाडीला निघून जातो. सर्व पात्रे रंगपीठावरून अंतर्धान पावल्यानंतर पुन्हा सूत्रधार येतो. 'मी तुमच्यापुढे हे सादर केले' असे खुणेने सांगतो, विंगेत जातो–पुन्हा बाहेर पहिल्याप्रमाणेच डोकावतो, प्रेक्षकांना टाटा करायला !

दंडवतेंचे हे मूकनाटच बघताना, त्या प्रकाराला न सरावलेल्या मराठी प्रेक्षकांची खूप करमणूक होते. त्यातील 'अनाऊन्समेंट्स' हास्यकारक आहेत. उदा. ही गाडी व्ही. टी. वरून सुटून चर्चगेटला थांबेल वगैरे ! या मूकनाट्यातील ड्रमर (प्रथमेश

सावंत) याने अत्यंत कौशल्याने वाजविलेल्या ड्रमच्या तालबद्धतेवर पात्रांच्या हालचाली बसविण्यात आल्या होत्या आणि त्या संगीतामुळे आपण एखादा 'बॅले' पहात आहोत, असा भास होत होता.

मात्र त्या हीरोला केवळ काळे कपडे ल्यायला लावल्याने, त्याचे 'कॅरेक्टर' सुरुवातीला नीटसे स्पष्ट होत नाही. त्याऐवजी, त्याला 'चालू' हीरोप्रमाणे रंगीबेरंगी भडक वेष दिला असता, तर ते 'कॅरेक्टर' प्रेक्षकांना सहज समजू शकले असते, असे वाटते.

पण मराठी प्रायोगिक रंगभूमीवरील पहिला धीट प्रयोग म्हणून वृंदावन दंडवतेंच्या या मूकनाटयाचे मोल मोलाचे आहे.

□ □ □

## अंदाज

पृष्ठ ५१ वरून

करणारे, शास्त्रज्ञ, ज्योतिषी वगैरेंना प्रगतीपर आठवडा आहे. भागीदार चांगले वागतील. पत्नीकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. फॅन्सी वस्तूंचा व्यापार करणारांना अमाप नफा होण्याचा योग आहे.

चंद्रीचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. शुभ तारखा ९।१०।११।१२।१३.

**मीन :** शरीरप्रकृती साधारण नरमच राहील. धनस्थिती नाजूक राहील. बोलण्यात कठोरपणा येईल. त्यामुळे गैरसमज होतील. मंगळवार, बुधवारपर्यंत पुष्कळशी स्थिरस्थावरता येईल. अचानक व अकल्पित बाजूंनी आयुष्यात ध्यानात राहण्याजोगा प्रगतीचा टप्पा गाठला जाईल. सामाजिक मानमरातब प्राप्त होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश मिळेल. जो अभ्यास करीत असाल त्यात चांगली प्रगती होईल. उद्योगधंदा चांगलाच सरसावेल. मित्रांची, भागीदारांची सर्वांची संपूर्ण सहानुभूती मिळेल. शत्रूंच्याकडूनसुद्धा नकळत सहाय्य मिळेल. सरकारी कामात प्रगती होईल. जो जो व्यवसाय हातात घ्याल त्यात प्रगती निश्चित होईल.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. H-M 649

# अग्निपुत्र

वसंत पोतदार

प्रकाशनाच्या मार्गावर

तपशील
माणूस : बुधवार
१३ जानेवारी अंकात